प्रकरण पाचवे

डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार

म्हणी

५. १. प्रस्तावना
५. २. म्हणीची प्राचीन परंपरा व स्वरूप
५. ३. म्हणीची उत्पत्ती
५. ४. म्हणीची व्याख्या
५. ५. म्हणीचे महत्त्व
५. ६. म्हणींची सार्वत्रिकता
५. ७. डांग जिल्ह्यातील म्हणी
    ५. ७. १. सत्याला पुष्टी देणाऱ्या म्हणी
    ५. ७. २. 'चांगले केल्याने चांगलेच होते' ही शिकवण देणाऱ्या म्हणी
    ५. ७. ३. 'जशास तसे' हे मत व्यक्त करणाऱ्या म्हणी
    ५. ७. ४. 'हे करा पण ते करू नका' ही शिकवण देणाऱ्या म्हणी
    ५. ७. ५. अतिशयोक्तीवर भाष्य करणाऱ्या म्हणी
    ५. ७. ६. गरिबी व्यक्त करणाऱ्या म्हणी
    ५. ७. ७. कुटुंबाशी संबंधित असणाऱ्या म्हणी
    ५. ७. ८. माणसाच्या आळशीपणावर आधारित म्हणी
    ५. ७. ९. इतर म्हणी
५. ८. कथाबीज असलेल्या म्हणी
५. ९. डांग जिल्ह्यातील म्हणींचे महत्त्व
५. १०. डांग जिल्ह्यातील म्हणींचे वेगळेपण
५. ११. डांग जिल्ह्यातील म्हणींची सामाजिकता

उखाणे व आहाणे

५. १२. उखाणे व आहाणे यातील साम्यभेद
५. १३. उखाण्याचे विविध बोली आणि भाषेतील प्रतिशब्द
५. १४. उखाण्याची प्राचीनता
५. १५. नाव घेण्याचे उखाणे डांग जिल्ह्यात सापडत नाहीत
५. १६. डांग जिल्ह्यातील उखाणे
    ५. १६. १. शेतीविषयक डांगी उखाणे
    ५. १६. २. प्राणी, पक्षी व कीटकांविषयक डांगी उखाणे
    ५. १६. ३. मानवी शरीराविषयी डांगी उखाणे
    ५. १६. ४. निसर्ग सृष्टीविषयक डांगी उखाणे

५. १६. ५. घरोपयोगी वस्तूंविषयक डांगी उखाणे
५. १६. ६. आहारविषयक डांगी उखाणे
५. १६. ७. अश्लील प्रकारातले डांगी उखाणे
५. १६. ८. इतर प्रकारचे डांगी उखाणे
५. १७. उत्तरातील विषमता
५. १८. अतिउच्च निरीक्षण शक्ती
५. १९. अश्लील शब्दयोजना
५. २०. उखाण्यात आढळून येणारा बदल
५. २१. उखाणे अनेक उत्तर एक
५. २२. उखाण्यातील साम्यता

वाक्प्रचार

५. २३. वाक्प्रचार म्हणजे काय?
५. २४. डांग जिल्ह्यातील वाक्प्रचार
५. २४. १. शरीरावयवावर आधारलेले डांगी वाक्प्रचार
५. २४. २. मानवी स्वभावावर आधारलेले डांगी वाक्प्रचार
५. २४. ३. निसर्गाशी निगडीत डांगी वाक्प्रचार
५. २४. ४. श्रद्धा-अंधश्रद्धेवर आधारलेले डांगी वाक्प्रचार
५. २४. ५. दु:ख-आनंदावर आधारलेले डांगी वाक्प्रचार
५. २४. ६. व्यसन-आहारावर आधारलेले डांगी वाक्प्रचार
५. २४. ७. पक्षी-प्राण्यावर आधारलेले डांगी वाक्प्रचार
५. २४. ८. घर-शेतीशी निगडीत डांगी वाक्प्रचार
५. २४. ९. इतर प्रकारचे डांगी वाक्प्रचार
५. २५. वाक्प्रचाराचे वर्गीकरण करताना
५. २६. समारोप

संदर्भ ग्रंथ
साधन व्यक्ती

प्रकरण पाचवे

डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार

---

५. १. प्रस्तावना:

प्रस्तुत प्रकरणामध्ये डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार यांचा सखोल अभ्यास केला गेला आहे. हा अभ्यास करत असतांना अगदी प्राचीन परंपरादेखील तपासण्याचा प्रयत्न केला आहे. वेद वाङ्मयात सापडणाऱ्या म्हणी, उखाण्यांच्या पाऊलखुणा आणि त्यानंतरच्या काळात त्यांचा होत गेलेला विकास यादृष्टीनेही तपासणी केली आहे. म्हणी, उखाण्यांची उत्पत्ती कशी झाली? त्यांचा उत्तरोत्तर विकास कसा होता गेला? त्यांना वेगवेगळ्या बोली-भाषेत काय म्हणतात? अशा अनेक प्रश्नांची उकल करण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. या प्रकरणात म्हणी आणि उखाण्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करण्यात आले आहे. त्या त्या ठिकाणी कठीण डांगी बोलीतील शब्दांचे प्रमाण मराठी अर्थही देण्यात आले आहेत. प्रकरणाच्या शीर्षकानुसार आधी म्हणींचा सविस्तर विचार केला आहे. त्यानंतर उखाणे किंवा आहाणे यांचा सविस्तर विचार केला आहे. आणि शेवटी वाक्प्रचारांचा सविस्तर विचार केला आहे.

म्हणी

५. २. म्हणीची प्राचीन परंपरा व स्वरूप:

भारतीय म्हणींच्या संदर्भात प्राचीन परंपरेचा विचार करता आपल्याला वेदांकडे डोळसपणे पाहावे लागते. प्राचीन म्हणींचे माग या वेद वाङ्मयामध्ये स्पष्टपणे दिसून येतात. नंतरच्या रामायण, महाभारत, बौद्ध वाङ्मय, जैन वाङ्मयामध्ये म्हणींचे रूप अधिक स्पष्ट होत जाते. "म्हणीला किंवा लोकोक्तीला 'आह्', 'ब्र', 'वच', 'कथ', 'भाष्' हे पाची 'बोलणे' या अर्थीचे धातू पूर्वीपासून वापरले गेले आहेत. 'भण्' हा धातूही पुढे पुढे वापरला जाऊ लागला."[१] आज जरी 'सुभाषित' आणि 'लोकोक्ती' यामध्ये फरक केला जात असला तरी प्राचीनकाळी सुभाषित आणि लोकोक्ती यामध्ये पंडितांनी किंवा साहित्यमीमांसकांनी कुठलाही फरक केलेला आढळत नाही. दुर्गा भागवतांच्या लोकसाहित्याची रूपरेखा या ग्रंथात वैदिक लोकोक्तींची ऋग्वेदसंहितेतील काही उदाहरणे दिली आहेत. त्यापैकी एक, "'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवा'-'देव कष्ट न करणाऱ्याच्या सहाय्याला येत नाहीत.'"[२] ही म्हण आजही आपण वापरतो. याचा अर्थ असा की, वैदिक वाङ्मयामध्ये ज्या अर्थी म्हणींची रूपे सापडतात त्या अर्थी वैदिक वाङ्मयाच्या पूर्वीही जनमाणसात ह्या म्हणी प्रचलित होत्या. असे असले तरी वैदिक काळात म्हणीला प्रतिशब्द नेमका कुठला होता हे निश्चितपणे सांगता येत नाही. त्यामुळेच सुक्त, उक्ती, सूक्ती, लोकोक्ती, सुभाषित यांच्या स्वरूप विशेषांचा अभ्यास करून आपल्याला म्हणींच्या पाऊलखुणांचा शोध घ्यावा लागतो.

५. ३. म्हणीची उत्पत्ती:

लोकसाहित्याची निर्मिती ही मानव जेव्हापासून लोकसमूहाने राहू लागला तेव्हापासून किंवा त्यानंतरची आहे असे मान्य करावे लागते. कारण एकटा दुकटा मानव लोकसाहित्याची निर्मिती करू शकत नाही. किंबहुना त्यावेळी त्याच्याकडे भाषा नावाची कोणतीही वस्तू उपलब्ध नव्हती. जेव्हा तो समूहाने पहिल्या प्रथम राहू लागला तेव्हा त्याला भाषेची जान झाली असावी. त्याबरोबरच लोकसाहित्याच्या निर्मितीचीही प्रक्रिया सुरु झाली असावी. एकमेकांच्या संवादातून, एकमेकांच्या अनुभवातून ही निर्मिती संभवते.

लोकगीतांप्रमाणे मात्र म्हणींची निर्मिती समूहमनातून झालेली आहे असे अभ्यासक मानत नाहीत. "म्हण ही जनतेच्या मनातून स्फुरलेली वस्तू नव्हे. म्हण ही एकदाच, एकाच व्यक्तीच्या विचारातून व उच्चारातून तयार होते."[३] असे दुर्गा भागवत त्यांच्या लोकसाहित्याची रूपरेखा या ग्रंथात म्हणतात. तर हिंदी भाषिक कन्हैयालाल सहल हे 'राजस्थानी कहावतें एक अध्ययन' या त्यांच्या पुस्तकात म्हणीच्या उत्पत्ती प्रक्रियेसंदर्भात एक सुंदर उदाहरण देतात. ते म्हणतात, "जो घडा पूरा भरा नहीं होता, वह कुछ छलकता है और छलकने से आवाज होती है | इसके विरुद्ध जो घडा पूरा भरा होता है, वह न छलकता है और न उसमें से कोई आवाज ही होती है | पानी का घडा लेकर आती हुई स्त्रियों के सम्बन्ध में यह हमारा प्रतिदिन का अनुभव है | किन्तु यह तो मात्र नेत्रानुभव है | न जाने कितने लोग इस दृश्य को देखते हैं किन्तु किसी प्रकार की मानसिक प्रतिक्रिया उनमें नहीं होती | किन्तु किसी दिन एक विचारशील व्यक्ति के मन में यह दृश्य उस व्यक्ति का चित्र सामने खडा कर देता है जो बोलता बहुत है किन्तु जिसका ज्ञान अधकचरा है, जिसकी विद्या अधुरी है | ऐसी स्थिती में नेत्रानुभव मन के अनुभव के रूप में परिणत हो जाता है और उसके मुख से सहसा निकल पडता है 'अधजल गगरी छलकत जाय' | यद्यपि यह वाक्य प्रसंग-विशेष पर एक व्यक्ति के मुख से निकला था तथापि समान प्रसंग आने पर अन्य लोग भी इस वाक्य की आवृत्ति करने लगते हैं | इस प्रकार एक व्यक्ति की उक्ति लोक की उक्ति बन जाती है, कहावत का रूप धारण कर लेती है |" यावरून आपल्याला असे म्हणता येते की, दैनंदिन जीवनामध्ये आपल्याला अनेक नेत्रानुभव येत असतात. परंतु हे नेत्रानुभव जोपर्यंत मनानुभवाचे रूप धारण करत नाहीत तोपर्यंत नेत्रानुभावाचा काहीही उपयोग नाही. हे नेत्रानुभव आणि मनानुभव जेव्हा एकरूप होतात. आणि त्याच्यातून जी निर्मिती होते ती समाजमनाने स्वीकारलेली असते. अशा स्वीकारलेल्या म्हणण्याला आपण म्हण म्हणू शकतो. ही निर्मिती किंवा म्हणणे एकाच व्यक्तीचे असले तरी ते कालांतराने समाजमनात विरघळते, पुसट होते आणि शेवटी लोप पावते.

५. ४. म्हणीची व्याख्या:

वरील विवेचनावरून म्हणीच्या स्वरूपाबद्दल बरीचशी कल्पना आली असेल. ही कल्पना अधिक दृढ करण्यासाठी काही व्याख्या पाहणे गरजेचे आहे.

१. 'Proverbs are remarks which on account of their shortness and correctness have been saved out of the wreck and ruins of ancient philosophy.' म्हणीचे रूप सुटसुटीत असते आणि तिच्यात विपुल आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य असते. तसेच

म्हणीची परंपरा अतिशय प्राचीन असते. असे वरील व्याख्येतून ॲरिस्टॉटलने सांगितले आहे.[४] या व्याख्येला म्हणींच्या उपलब्ध असणाऱ्या व्याख्यांपैकी पहिल्या व्याख्येचा मान दिला जातो.

२. 'अगदी मार्मिकपणे, शक्य तितक्या मोजक्या शब्दांत विदारक सत्य प्रगट करणारे वचन म्हणजे म्हण.' अशी व्याख्या अलेक्झांडर क्रापने केली आहे. तर हे सत्य प्रगट करण्याच्या तीन तऱ्हा असतात असे दुर्गा भागवतांनी सांगून, 'अपूर्ण स्थितीचे दिग्दर्शन, अतिशयोक्तीने वर्णन आणि रूपकाचा आश्रय' [५]ही तीन त्यांची वैशिष्ट्येही सांगितली आहेत.

३. 'अपने कथन की पुष्टि में, किसी को शिक्षा या चेतावनी देने के उद्देश्य से, किसी बात को किसी की आड में कहने के अभिप्राय से अथवा किसी को उपालम्भ देने व किसी पर व्यंग कसने आदि के लिए अपने में स्वतन्त्र अर्थ रखने वाली जिस लोक-प्रचलित तथा सामान्यतः सारगर्भित, संक्षिप्त एवं चटपटी उक्ति का लोग प्रयोग करते हैं, उसे लोकोक्ती अथवा कहावत का नाम दिया जा सकता है |[६] अशी व्याख्या कन्हैयालाल सहलने दिली आहे.

याव्यतिरिक्त अनेक देश विदेशातल्या अभ्यासकांच्या म्हणीविषयी केलेल्या व्याख्या देता येतील. परंतु या सगळयांच्या व्याख्यांतून जे समोर येते ते म्हणजे म्हणीतील लघुता, सत्यता, सूक्ष्मता, तीक्ष्णता, व्यावहारिकता, लोकमान्यता आणि चटकदारपणा हे गुण. या गुणांवरच आधारलेल्या म्हणी समाजात चिरकाल टिकून राहतात असे त्यांचे मत आहे.

५. ५. म्हणीचे महत्त्व:

म्हणी माणसाच्या दैनंदिन जीवनात खूप उपयोगी पडतात. एखादा माणूस त्याचा रस्ता चुकत असेल, समाजनियमाच्या बाहेर जात असेल तर त्याला भटकलेल्या रस्त्यावर, नियमाच्या बाहेर गेलेल्याला नियमात आणण्याचे महत्त्वाचे काम या म्हणी करतात. थोडक्यात पण विदारक सत्य मांडण्याचे काम या म्हणी करत असतात. म्हणूनच त्यांची तुलना वेदांशी केल्याचे दिसून येते. "कन्नड में कहा जाता है – "गादेय मर्म वन्नरितवनु वेदद मर्मवन्नरितवन्नु" – जो जाने कहावत का मर्म सो जाने वेद का मर्म | - " गादे वेदक्के समान" – कहावतें वेद के समान हैं | "वेद सुळ्ळादरू गादे सुळ्ळागदु" – वेद भी झूठे साबित हो सकते हैं, पर कहावत झूठ नहीं हो सकती | एक मल्याळम् कहावत में कहावतों के बारे में अत्यधिक विश्वास प्रकट हुआ है "पळंच्चोळिळल् पतिरिल्ल" – अर्थात कहावत में भूसा नहीं भरा होता | अगर वेदों ने अज्ञान के अंधेरे में भुले भटके, छटपटाते मानव को प्रकाश दिया है तो कहावतें भी जीवन में मनुष्य की पथप्रदर्शक हो सकती हैं इसमें कोई संदेह नहीं है |"[७] ज्या अर्थी म्हणींचे महत्त्व वेदांबरोबर सांगितले आहे. किंबहुना एकावेळी वेदही खोटे ठरू शकतात पण म्हणी मात्र कधी खोट्या ठरू शकत नाहीत. असा विश्वास यातून व्यक्त केला आहे. ज्याप्रमाणे वेदांनी एकेकाळी अंधारात चाचपडणाऱ्या मनुष्याला ज्ञानाचे दिव्य प्रकाश दाखवले, त्याचप्रमाणे म्हणींचेही महत्त्व असाधारण आहे.

५. ६. म्हणींची सार्वत्रिकता:

आज जगाच्या पाठीवर कितीतरी भाषा - बोली बोलल्या जातात. यामध्ये क्वचितच एखादी भाषा किंवा बोली असेल की, जिच्यामध्ये म्हणी बोलल्या जात नाहीत. म्हणी ह्या प्रत्येक भाषेत,

बोलीत आहेत. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या म्हणी एकमेकांच्या खूप जवळ आहेत. त्यांच्यात अनेक बाबतीत साम्यता दिसून आली आहे.

एक बोली दुसऱ्या बोलीपासून, एक भाषा दुसऱ्या भाषेपासून, एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीपासून, एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रापासून कितीही दूर असला किंवा जवळ असला, त्याच्यात एकमेकांमध्ये संबंध असला अथवा नसला तरीही ह्या म्हणी एकमेकांच्या खूप जवळ येतात. याचे कारण असे की, या म्हणींमध्ये असणारे सार्वत्रिक अनुभूती व सार्वकालिक सत्य हे गुण. या गुणांमुळे म्हण चिरकाल टिकते व लोकप्रचलित राहते. हे सार्वकालिक सत्यानुभव सर्व बोली, भाषा, संस्कृती यांच्या सीमा तोडून गेल्याने एकाच वेळी अनेक ठिकाणी, अनेक बोली, भाषेत अनेक म्हणी तयार झाल्या.

५. ७ डांग जिल्ह्यातील म्हणी:

डांगमध्ये ज्या मौखिक म्हणी आढळतात त्या बहुतेक बाहेरच्या जगात आढळणाऱ्या म्हणींशी मिळत्याजुळत्या आहेत. त्यांच्या डांगी बोलीनुसार त्यामध्ये थोड्याफार प्रमाणात शब्दांची फेरफार झालेली आढळते. म्हणजेच भाषांतरित झालेल्या म्हणी आढळतात. तर काही म्हणी या स्वतंत्ररीत्या डांगी बोलीतून अवतरीत झाल्या आहेत. या म्हणींचे अभ्यासकांच्या सोयीसाठी म्हणींच्या आशयाला केंद्रस्थानी ठेवून वर्गीकरण करण्याचा मी प्रयत्न केला आहे. तर काही म्हणींचे वर्गीकरण करणे खूप कठीण आहे असे मला जाणवले. कारण म्हण एकच असली तरी तिच्यातून व्यक्त होणारा आशय खूप मोठा, व्यापक आणि अनेकार्थी असल्याचे दिसून आले आहे.

५. ७. १. सत्याला पुष्टी देणाऱ्या म्हणी:

जेव्हा एखादे सत्य अधिक स्पष्ट करून सांगण्याची वेळ येते, तेव्हा अनेक लोकं अनेक प्रकारच्या म्हणींचा वापर करतात. त्यापैकी एक म्हणजे..

दुधना दूध अन् पाणीना पाणी

(दुधाचं दूध आणि पाण्याचं पाणी)

ही म्हण डांगमध्ये सहजतेने वापरली जाते. एवढेच नाही तर ही म्हण बहुतेक सर्वच ठिकाणी प्रचलित आहे. मराठीत तिला 'दुधाचं दूध आणि पाण्याचं पाणी' तर हिंदीमध्ये तिला 'दूध का दूध, पानी का पानी' असे म्हणतात. जेव्हा एखादं खोटं सत्यावर आरूढ होतं त्यावेळी सत्याच्या पक्षाकडील व्यक्तींकडून ही म्हण म्हटली जाते. हिंदीमध्ये या म्हणीचा अर्थ "पूरा पूरा न्याय करना; जैसे पंचों से यही विनती है की तुम इस घडी न्याय के आसन पर बैठे हो, अपने इंसाफ से दूध का दूध पानी का पानी कर दो |"[८] ज्याठिकाणी पूर्ण न्यायाची अपेक्षा असते त्या ठिकाणी अशा म्हणींचा वापर केला जातो. खोट्याचं खोटं आणि खऱ्याचं खरं व्हावं हीच अपेक्षा डांगमधील म्हणीतूनही व्यक्त केली जाते.

वरील म्हणीशी मिळतीजुळती आणि सत्याला पुष्टी देणारी अजून एक म्हण सापडते ती अशी,

आंगी नी सेव त कासना भेव

(अंगी नाही सेव त्याला कशाचा भीती)

एखाद्याला एखाद्या पापाचा भागीदार बळजबरीने बनवले जाते, खोटेपणाचे आरोप बळजबरीने लावले जातात, तेव्हा हे आरोप खोडून काढण्यासाठी ही म्हण त्याच्या तोंडी येत असते. या म्हणीतून अशा व्यक्तीला खूप मोठा आधार मिळतो. तो असत्याबद्दल तटस्थ भूमिका घेत असतो. मराठीत याच अर्थाची एक म्हण पाहायला मिळते ती अशी, "कर नाही त्याला डर कशाला - म्हणजे ज्याने दुष्कृत्य किंवा अयोग्य आचरण केले नाही त्याला भीती (डर) का वाटेल? वाटणार नाही."[९]

उपरोक्त दोन्ही म्हणी ह्या स्वतःवरचे सत्य अधिक दृढ करण्यासाठी वापरल्या जातात असे लक्षात येते. म्हणजेच त्या स्वतःला मानसिक आधार देण्यासाठी वापरल्या जातात. काहीवेळा त्या दुसऱ्यालाही मानसिक आधार देत असतात. हे सत्य स्वतःपुरते म्हणजे व्यक्तीपुरते मर्यादित असते. आता सार्वत्रिक सत्य पटवून देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या म्हणी पाहू,

जन्म अह त मरण अह

(जन्म आहे तर मरण आहे)

म्हणजे जन्म आहे तर मरण आहे. हे सत्य सार्वत्रिक आहे. सगळ्या जगाला व्यापून आहे. पृथ्वीवर जोही जन्माला येतो तो कधी ना कधी मरतोच मरतो. म्हणूनच पृथ्वीला पुराणांमध्ये मृत्युलोक असेही म्हटले गेले आहे. हे वैश्विक सत्य डांगसारख्या प्रदेशात एखाद्या म्हणीतून का व्यक्त केले जाते. तर आलेले सगळेच दिवस सारखे नसतात. ते पालटतात. आपल्यालाही चांगेल दिवस येतील. आपल्यालाही सुख समाधानाचे दिवस अनुभवायला मिळतील अशी सुप्त अपेक्षा त्यामागे असते. याच अर्थाची अजून एक म्हण अशी,

सुख अह त दुख अह

(सुख आहे तर दुःख आहे)

ज्या ठिकाणी सुख आहे त्याठिकाणी दुःखही आहे असा या म्हणीचा आशय आहे. वरील दोन्ही म्हणींचा आशय वेगवेगळा असला तरी दोन्ही म्हणी एकाच अर्थाने वापरल्या जातात. एखादी व्यक्ती आपल्या निजी जीवनात खूप दुःखी असेल त्यावेळी सांत्वनास्तव 'सुख अह त दुख अह' आणि दुख अह त सुख अह' अशी आलटून पालटून ही म्हणी वापरली जाते. या म्हणीच्या श्रवणातून माणसाची जगण्याची आशा वाढते, त्याला जीवनात खंबीरपणे उभे राहण्याची ताकद येते. ती ताकद, ती आशा यामुळे की आपलेही दिवस एकदा तरी चांगले येतील.

सत्याला पुष्टी देणारी अजून एक म्हण अशी.

माटीना चुला माटीमां मिळह

(मातीची चूल मातीलाच मिळते)

म्हणजे मातीची चूल मातीलाच मिळते असा याचा वाच्यार्थ होतो. परंतु म्हणीच्या विशेषानुसार म्हणीचा लक्षणार्थ हा खूप वेगळा आहे. येथे मातीची चूल म्हणजेच मानवी देह आणि मातीलाच मिळणे म्हणजे मृत्युनंतर त्याची मातीच होणे असा आहे. मानवी शरीर मृत्युनंतर मातीलाच मिळणार हे सत्य या म्हणीतून सांगितले जाते.

५. ७. २. 'चांगले केल्याने चांगलेच होते' ही शिकवण देणाऱ्या म्हणी:

'कर भला सो हो भला' असं आपण नेहमी ऐकत असतो. जेव्हा आपण स्वतः चांगला विचार करू तेव्हाच समोरचाही आपल्याबद्दल चांगला विचार करेल. म्हणजे चांगले केल्याने चांगलेच होणार आणि वाईट केल्याने वाईटच होणार आहे. हे म्हणणे पटवून देण्यासाठी डांगमध्ये काही म्हणी प्रचलित आहेत. त्यांचा थोडक्यात येथे परिचय करून घेऊ.

जो जगनी सेवा करह, तेनीज भगवान सेवा करह

(जो जगाची सेवा करतो, त्याचीच ईश्वर सेवा करतो)

म्हणजे जो जगाची सेवा करेल, त्याचीच ईश्वर सेवा करेल. ज्याचे आचरण चांगले असेल त्याची ईश्वरही मदत करतो. या जगात नुसता माणूसच आहे असे नाही तर प्रत्येक जीवजंतूंविषयी आपल्या मनात आदर हवा, आपुलकी हवी, प्रेम हवा, सेवाभाव हवा असे ज्याच्याठायी असेल त्याला ईश्वरही मदत करतो. याच अर्थाची अजून एक म्हण अशी,

तू करसील चांगला, त हुईल तुना चांगला

(तू करशील चांगले, तर होईल तुझेही चांगले)

या म्हणीचाही तोच भावार्थ आहे. तू चांगले करशील तर तुझेही चांगलेच होईल.

जेना दिवस बेस, तेना आखाज बेस

(ज्याचे दिवस चांगले, त्याचे सर्वच चांगले)

ज्याचे दिवस चांगले त्याचे सर्वच चांगले. पण हे चांगले दिवस आणण्यासाठी आधी चांगले कर्म करावे लागते. हेही तो विसरत नाही. आणि म्हणून पुढे म्हणतात,

जेना भला, तेना बेस

(ज्याचे भले, त्याचे चांगले)

ज्याचे भले त्याचे बेस. बेस म्हणजे चांगले. थोडक्यात वरील चारही म्हणींतून एकच भावार्थ प्रकट होतो. तो म्हणजे सेवाभाव. दुसऱ्याची सेवा करा, ईश्वर तुमची सेवा करेल. दुसऱ्याचे चांगले करा, ईश्वर तुमचे चांगले करेल. हेच भाव या म्हणींतून व्यक्त केले जातात.

५. ७. ३. 'जशास तसे' हे मत व्यक्त करणाऱ्या म्हणी:

जो जसे वर्तन करेल त्याला तसेच फळ मिळेल. हे मत अधिक स्पष्ट करण्यासाठी खालील काही म्हणी पाहू,

जिसा करसील, तीसा भरसील

(जसे करशील, तसे भरशील)

जिसा स्वभाव, तिसी असर

(जसा स्वभाव, तसा परिणाम)

जिसा दिवस, तिसी रात

(जसा दिवस, तशी रात्र)

जिसा माणूस करह, तीसाज भोगह

(जसा माणूस करतो, तसाच भोगतो)

जो खाडा खोदह, तोज खाडामा पडह

(जो खड्डा खणतो, तोच खड्ड्यात पडतो)

साक्र्याला वार्का

(जशास तसे)

‘जसे करशील तसे भरशील, करावे तसे भरावे, बाप तसा बेटा, जसे बीज तसा अंकुर, जसे दिवस तशा रात्री, जशी खाण तशी माती’ अशा अनेक मराठी म्हणी वरील डांगी म्हणींशी मिळत्याजुळत्या आहेत. तसेच हिंदी म्हणीही या आशयाच्या मिळतात. ‘जैसी करनी वैसी भरनी, जैसी नीयत वैसी बरकत, जैसे को तैसा, जैसे गुरु वैसा चेला, जो बोओगे सो काटोगे’ अशा अनेक हिंदी म्हणीही या डांगी म्हणींशी मिळत्याजुळत्या पाहायला मिळतात. जो जसे कर्म करेल त्याला तसेच फळ मिळेल हे यातून दिसून येते. ‘साक्र्याला वार्का’ म्हणजेच जशास तसे. जो जसा व्यवहार करेल त्यालाही तसाच व्यवहार करणारा किंबहुना त्याच्याहून थोडा वरचढ व्यवहार करणारा व्यक्ती भेटेल. जो खड्डा खाणेल तोच त्याच्यात एकदिवस पडेल.

जिसा डुंगर, तिसा उंदर

(जसा डोंगर, तसा उंदीर)

‘जसा देश तसा भेस’ किंवा ‘जैसा देश वैसा भेस’ ह्या म्हणण्याप्रमाणे भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशात अनेक प्रकारचे लोक राहतात. त्या प्रत्येकाची आपली आगळीवेगळी संस्कृती आहे. म्हणून वर म्हटले आहे, ‘जिसा डुंगर तिसा उंदर’ म्हणजे जसा देश तशी तिथली संस्कृती. ही संस्कृतीही परिवर्तनीय असते. तिच्यात वारंवार अनेक प्रकारचे बदल होत असतात. यातील एक बदल असा,

जिसा वर्स, तिसी फेसन

(जसे वर्षे, तशी फॅशन)

वर्ष बदलतात तशी फॅशनही बदलते. म्हणजे नवे रंग, नवे ढंग, नवी चाल अवलंबली जाते. घरादारात अनेक नव्या वस्तूंनी आपली जागा घेतलेली असते. अगदी स्वतःमध्येही बरेच बदल झालेले दिसून येते. नुसता लहानपणीचा आरसा जरी आपल्या डोळ्यापुढे ठेवला तरी त्यावेळची परिस्थिती आणि आताची परिस्थिती यात जमीन आस्मानचा फरक दिसेल. या बदलत्या परिस्थितीला पुष्टी देणारी एक म्हण अशी,

आता जमाना आना पापना, न पोसा नीही बापना

(आता जमाना आला पापाचा, अन् मुलगा नाही बापाचा)

सध्याच्या जमान्यात कोणी कोणाचे नसते हे पटवून देण्यासाठी वरील म्हण वापरली जाते. म्हणजे ह्या काळात किंवा युगात भाऊ भावाचा नाही, बहिण भावाची नाही, बाप मुलाचा नाही अशी काहीशी दुभंगलेली परिस्थिती निर्माण होताना दिसत आहे. या दुभंगलेल्या परिस्थितीत कोणीही कोणाचे ऐकून घ्यायला तयार होत नाही. जो तो स्वतःला शहाणा समजायला लागला आहे. म्हणून वरील म्हणीतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे की, 'आता जमाना आना पापना, न पोसा नीही बापना' म्हणजेच या पापी जमान्यात स्वतःची मुलंही आपल्या बापाला ऐकत नाहीत. आजची मुलं स्वतःच्या बापालाही कस्पटासमान समजतात ही विदारक स्थिती या म्हणीतून कथन करण्याचा प्रयत्न केला आहे.

५. ७. ४. 'हे करा पण ते करू नका' ही शिकवण देणाऱ्या म्हणी:

काहीवेळा 'चोराच्या हाती द्यावे पण पोराच्या हाती देऊ नये'[१०] अशी परिस्थिती निर्माण होते. म्हणजे एखादी वस्तू देणे भाग पडते. पण अशावेळीही समोरच्याचं नुकसान होत असेल तर त्यावेळी देणाऱ्याने आपला हात आखडता घ्यावा. जसे,

खावला देवला पण पेवला (दारू) नी देवला

(खायला द्या पण प्यायला (दारू) देऊ नका)

एखादी व्यक्ती उपवासी असेल तर त्या व्यक्तीला खायला द्या. पण कोणी दारू प्यायला मागत असेल तर ती देऊ नका. आदिवासी म्हटले की त्यांच्या प्रत्येक सण-उत्सवाला दारू लागतेच. त्याच्याशिवाय त्यांचे भागतच नाही. आदिवासींमध्ये लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या कोताऱ्यापर्यंत स्त्री पुरुष सगळेच दारू पितात, हे आता अनेक साहित्यिकांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. दारू ही त्यांच्या पाचवीलाच पुजलेली असते असेही म्हटले जाते. म्हणजे अगदी बाळोत्यातल्या बाळाही औषध म्हणून का होईना दारू पाजली जाते. अशा पिचलेल्या, पोळलेल्या समाजामध्येही अशी म्हण सापडू शकते ही एक आनंदाची गोष्ट आहे. म्हणजे त्यांनाही दारूचे दुष्परिणाम जाणवले आहेत असे म्हणता येते. म्हणून ते म्हणतात एकवेळ खायला द्यावे पण प्यायला देऊ नये. अशीच काहीशी एक दुसरी म्हण आहे.

पाठ्वर मारुला पण पोटवर नी मारुला

(पाठीवर मारावे पण पोटावर मारू नये)

दोन व्यक्तींमध्ये किंवा दोन समाज गटांमध्ये भांडणे झाली असता. ते एकमेकांची खोडी मोडण्यासाठी वेगवेगळया क्लृप्त्या योजत असतात. त्यातून काहीवेळा खूप मोठे नुकसान होऊ शकते.इतकेच नाही तर त्या कृत्यातून त्यांच्या जगण्याचा आधारही काही वेळा तुटू शकतो. थोडक्यात भांडणे झाली असता किंवा कोणत्याही गोष्टीचा राग आला असता, दोन शब्द भांडून घ्यावे, दुषणे द्यावी, नाहीच राग आटपला तर दोन चापट मारून घ्यावे. पण त्याच्या व्यवसायावर कधी प्रहार करू

नये, त्याच्या रोजीरोटीवर कधी प्रहार करू नये, त्याचा व्यवसाय हिसकावून घेऊ नये, त्याचा व्यवसाय बुडवण्याचा प्रयत्न करू नये. तसे पाहता भांडण करणे, शिव्या देणे किंवा एखाद्याला मारझोड करणे हेही वाईटच आहे. परंतु त्याहून वाईट म्हणजे एखाद्याच्या रोजीरोटीचा आधारच तोडून टाकणे हे होय. म्हणून डांगीमध्ये एका म्हणीद्वारे म्हटलंय की, पाठ्वर मारुला पण पोटवर नी मारुला.

अशाच प्रकारची अजून एक म्हण डांगमध्ये सापडते. त्यामध्ये करून दाखवा पण बोलून नका दाखवू असे म्हटले आहे.

करी दाखववा पण सांगी नी दाखववा

(करून दाखवावे पण सांगून दाखवू नये)

काही लोकांना सांगत फिरण्याची सवयच असते की, 'मी हे करेल मी ते करेल.' पण प्रत्यक्षात मात्र ते काहीही करत नाहीत. सांगणे आणि करणे यामध्ये खूप अंतर आहे. सांगणे जेवढं सोपे आहे तेवढेच प्रत्यक्षात कार्य करणे खूप कठीण असते. शिवाय याच्या त्याच्याजवळ सांगितले तर काहीवेळा त्यांच्याकडूनच त्या कार्यात विघ्न येण्याची शक्यता असते. कारण 'आपले शत्रू आपल्याच शेजारी' असतात. शिवाय एखादी गोष्ट सांगून ती केली नाही की, आपलीच छबी खराब होते. म्हणून कोणतेही काम असेल तर ते करून दाखवावे पण सांगून दाखवू नये.

५. ७. ५. अतिशयोक्तीवर भाष्य करणाऱ्या म्हणी:

म्हणीचा एक गुणधर्म म्हणजे अतिशयोक्ती हा होय. अतिशयोक्ती काहीवेळा म्हणीला चटकदारपणा यावा, यमकाची जुळवाजुळव व्हावी म्हणून योजली जाते. तर काहीवेळा एखाद्या व्यक्तीच्या अतिशयोक्तीवरही भाष्य करणाऱ्या म्हणी सापडतात.

मोठे मोठे गोठी हानह

(मोठ्या मोठ्या गोष्टी करतो)

असी गोठ करह का गावमं अखेलाज माहीत आहा

(अशी गोष्ट करतो का गावात सगळ्यांनाच माहीत आहे)

हाथ आहात खिसामां तरी गाडी चालवह

(हात आहेत खिशात तरी गाडी चालवतो)

असी गोठ का ये आखे जगमं योज आहा मानस

(अशी गोष्ट का या अख्या जगात हाच आहे माणूस)

थोड्याफार फरकाने या म्हणींचा आशय एकसारखाच आहे असे दिसून येते. एखादा बोलता बोलता थापा मारायला लागला की, बाजूचे ऐकणारे सहज एकमेकांना कोपरखळी मारून इशारा करतात. आणि वरील उद्गार त्यांच्या तोंडी सहज येतात. हे अतिशयोक्तीचे वातावरण जेव्हा तयार होते तेव्हा बाजूला बसून ऐकणाऱ्याला त्याच्या खोटेपणाचा आव लक्षात आलेला असतो. त्याच वेळी दुसऱ्याला सावध करण्यासाठी वरील म्हणी वापरल्या जातात. मराठीत 'आंधळयाला चांद दाखवणे',

‘राईचा पर्वत करणे’ असे वाक्प्रचार सापडतात. त्याच्यातूनही अतिशयोक्ती करणाऱ्या व्यक्तीवर प्रहार केला जातो. एखाद्या व्यक्तीला सवयच असते की, एखादी छोटी गोष्ट मोठी करून सांगण्याची, अळणी गोष्ट तिखट मीठ - मसाला लावून चमचमीत करून सांगण्याची. या चमचमीतपणासाठी चमचमीत शब्दांचाही वापर केलेला असतो. आता खिशात हात घालून कोणी गाडी चालवू शकत नाही, राईचा पर्वत कधी तयार होऊ शकत नाही, आंधळ्याला समोरचही नीट दिसत नसेल तर तो चांद कुठून बघणार आहे. हा जो अतिशयोक्तीपणा आहे, हा बऱ्याच म्हणींचा आधार आहे, गुणधर्म आहे.

५. ७. ६. गरिबी व्यक्त करणाऱ्या म्हणी:

म्हणी ह्या त्या त्या समाजाचा आरसा असतात असे म्हटले जाते. डांग जिल्ह्यातील आदिवासी हे गुजरातच्या इतर प्रदेशाहून तसे गरीबच आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. या आदिवासींमध्ये प्रचलित असलेल्या गरिबीविषयी काही म्हणी अशा,

काम करं तठं अन् मांगी खा अठं

(काम करतो तिथे आणि मागून खातो इथे)

घरात पोटभर खायला मिळत नाही म्हणून एखादा गरीब माणूस भाकरीच्या तुकड्यासाठी सहज एखाद्याच्या कामाला न बोलावता निघून जातो. त्याला त्यावेळी पैशाची नाही तर फक्त भाकरीच्या तुकड्याची आशा असते. दिवसभर काम केल्यानंतर किमान एखादी भाकरी तरी मिळेल ही आशा त्यामागे असते. कारण कामाला याला बोलावलेले नसते म्हणून त्यालाही पैशाची आशा नसते. तर फक्त भाकरीची आशा असते. परंतु दिवसभर काम करूनही त्याला त्या ठिकाणी भाकरी मिळाली नाही तर तो हतबल होऊन शेवटी आपल्या घरी येतो. यातून या कुटुंबाची गरिबी तर दिसतेच दिसते शिवाय एवढे काम करूनही खायला मिळाले नाही तरी त्याने तिथे हक्काने मागून खाल्ले नाही. ‘मागून कसे खाऊ?’ हा पडलेला प्रश्न त्याने तिथेच न सोडवता तो घरी निघून येतो. अशा वेळी बायकोला कळते आणि तिच्या तोंडी सहज येते की, काम करतो तिथे आणि मागून खातो इथे.

ही परिस्थिती आता कुठे दिसत नसली तरी पूर्वीच्या काळी असे खरोखर होत असे. याचे पुरावे इतिहासाच्या अनेक पानांवर सापडतात. सुदृढ, संपन्न, श्रीमंत समाजाकडून दलितांवर झालेले अन्याय, आदिवासींवर झालेले अन्याय, गरिबांवर झालेले अन्याय इतिहासाच्या पानोपानी झळकतात. म्हणूनच हे गरीब म्हणतात,

गरीबला गरीबज वळखह

(गरिबाला गरीबच ओळखतो)

श्रीमंतीची आणि गरिबीची दरी खूप मोठी आहे. ही दरी भरून काढणे खूप कठीण आहे. श्रीमंत समाज हा गरीब समाजाकडे तुच्छतेनेच पाहणार. पिळवणूकीच्या नजरेनेच पाहणार अशी दृढ भावना या गरीबांमध्ये निर्माण झाली आहे. म्हणून ते म्हणतात गरिबाला गरीबच ओळखतो मोठी माणसं ओळखत नाहीत. गरीबाच्या चुलीपर्यंत सहज जाता येते तसे मोठ्या माणसांच्या किंवा श्रीमंतांच्या चुलीपर्यंत जाता येत नाही.

कठं राजा भोज अन् कठं गंगू तेली

(कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली -हिंदी)

कुठे राजा भोज आणि कुठे गंगू तेली. या दोघांमधली जी विषमता आहे तीच विषमता गरीब आणि श्रीमंत यांच्यातली आहे असे येथील गरिबांना वाटते. ते श्रीमंतांची बरोबरी नाही करू शकत आणि करूही इच्छित नाहीत. म्हणून ते म्हणतात,

चार दिवस मोठला मंग गरीब

(चार दिवस मोठे मग गरीब)

जर कोणाला दोन चार दिवस चांगले आले तर त्याने मातून जावू नये असा संदेश यातून दिला जातो. कारण पुन्हा पुढचे दिवस गरीबीचे येणार आहेत हे विसरून जावू नये. गरिबाला अजून एका गोष्टीची भीती वाटत असते ती म्हणजे कंजूष होण्याची. जर आपण कंजुषी केली तर आपले नाव खराब होईल अशी त्याला चिंता असते. म्हणून ते म्हणतात,

चिंगूस हुयाला ताहा वर्तन जाहा

(कंजूष होणाऱ्याचे वर्तन जाते)

यातून डांगी आदिवासी हे कंजुषीच्या पिंजऱ्यात स्वतःला कोंडून घेऊ इच्छित नाहीत. का तर कंजुषी केल्याने वर्तन जाते, चारित्र्य मलीन होते. आणि तेही खरेच आहे, कंजुषी तरी का करावी? एक पैसा सोडला तर त्यांच्याकडे सगळेच आहे. कंजुषी काय फक्त पैशाच्या देवाणघेवाणीतून सिद्ध होत नाही. तर ती सगळ्याच वस्तूंच्या देवाणघेवाणीतून सिद्ध होत असते. ती माणसाच्या वर्तनातून सिद्ध होत असते. शिवाय "आदिवासींकडे संचयी वृत्ती नाही. कारण एवढे घनदाट जंगल आहे. या जंगलात फळ खातो, उंबर खातो, शिकार करतो, मध खातो, भाजीपाला, कंदमुळे खाऊन आपले जीवन जगतो. हे जंगल कधीच संपणार नाही. मग संचय का करायचा?"[११] ह्याच कारणास्तव डांगी आदिवासी खूप उदार मनाचे पाहायला मिळतात. खरोखरच त्यांच्यात कधी कंजुषीपणा पाहायला मिळत नाही. साध्या सरळ स्वभावाचे ते असतात. कपटीपणाचा त्यांच्या ठिकाणी अभाव आहे. अशातही एखादा कंजूष दिसला तर लगेच 'माखीला पण पीठ खाऊदे नीही' (माशीलाही पीठ खाऊ देत नाही) असे म्हटले जाते.

येथील आदिवासींच्या जीवनात येणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना म्हणजे एक घर बांधणे आणि दोन लग्न करणे. या दोन्ही वेळी शक्यतो हे आदिवासी कर्जबाजारी होत असतात. म्हणून त्यांच्यादृष्टीने ह्या दोन्ही घटना खूप कठीण असतात. म्हणून ते म्हणतात,

घर बांदी हेरवा न लगन करी हेरवा

(घर बांधून पाहावं आणि लग्न करून पाहावं)

घर बांधणे आणि लग्न करणे ह्या दोन्ही घटना तशा कोणासाठीही सोप्या नाहीत. यामध्ये मेहनत आणि पैसा दोन्हींची गरज असते. त्यातच गरिबांची हालत अशी की,

पैसा काय झाडला लागताहा

(पैसे काय झाडाला लागतात)

लहान मुलांनी वारंवार मोठ्या माणसांकडे गोळ्या चॉकलेटसाठी पैसे मागितले की, त्यांच्या तोंडून सहज 'पैसे काय झाडाला लागतात का' हे शब्द बाहेर पडतात. तसे पाहता मराठीतही "पैसे काही झाडाला लागत नाहीत"[१२] अशी म्हण आहे. म्हणजे कष्ट केल्याशिवाय पैसा मिळत नाही असा त्याचा अर्थ होतो. असे असले तरी येथे फक्त येथील आदिवासींची गरिबी कशी आहे हेच दर्शवण्यासाठी ही म्हण योजली आहे. म्हणजे ते पाहिजे तेव्हा, पाहिजे तेवढा पैसा देऊ शकत नाहीत हे यातून दिसून येते.

५. ७. ७. कुटुंबाशी संबंधित असणाऱ्या म्हणी:

कुटुंबाशी संबंधित असणाऱ्या म्हणींमधून कुटुंबातील अनेक बारकावे समजू शकतात. जसे कुटुंबातील नातेसंबंध, त्यांच्यात असणारे हेवेदावे, त्यांची सामाजिक बांधिलकी, त्यांच्यातील ताणतणाव, कुटुंबाचा पूर्व इतिहास इत्यादी.

बाही करं काही

(जास्त माणसे असले की कोणतेही काम सहज साध्य होते)

'बाही करं काही' ही म्हण माझे आजोबा नेहमी वापरायचे. ही म्हण दिसायला जितकी लहान आहे, तितकाच तिच्यातून व्यक्त होणारा आशय मोठा आहे. 'बाही' म्हणजे सबंध हात, बाहू, दंड, भुजा असाही त्याचा अर्थ होतो. बाहुपाश, बाहुबल, बाहुभूषण, बाहुयुद्ध,[१३] बाह्या थापटणे, बाह्या फुरफुरणे[१४] या शब्दांतूनही बाहू किंवा बाही या शब्दाची प्रचीती होते. 'बाही' या शब्दाचे वरील अनेक पर्यायी अर्थ बघितले तरी त्यातून व्यक्त होणारा अर्थ हा संकुचित स्वरूपाचा आहे. प्रस्तुत म्हणीसाठी जो अर्थ हवा आहे त्याचे कुठेही त्यात दिग्दर्शन होत नाही. प्रस्तुत म्हणीत 'बाही' या शब्दाची व्यापकता खूप मोठी आहे. तो शब्द अनेक वचनाने आला आहे. त्यानुसार त्याचा अर्थ जन, लोक, माणसांची खूप संख्या असा होतो.

घरात खूप माणसे असली तर घरातले कोणतेही काम सहज साध्य होते. त्यामुळेच पूर्वी एकाच स्त्रीकडून दहा-बारा अपत्यांना जन्म दिला जात असे. शिवाय त्याकाळी एवढ्या अपत्यांना जन्म देणे म्हणजे भाग्याचीच गोष्ट असायची. ज्या ज्या घरामध्ये अपत्यांची संख्या मोठी असायची त्या त्या घरामध्ये ही म्हण हमखास वापरली जायची. या म्हणीचा बारकाईने विचार करता त्याकाळात स्वसंरक्षणासाठी खूप माणसांची गरज असायची. त्याहीपूर्वी माणूस समाज गटाने एकत्र राहू लागल्याने त्याला खूप माणसांची गरज भासू लागली असावी. यातूनच ही म्हण निर्माण झाली असावी. याची प्रचीती वि. का. राजवाडे यांचे 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' हे पुस्तक वाचतांना येते.ते म्हणतात, "ज्या मनुष्यजातीला अग्नी कसा उत्पन्न करावा हे माहीत नव्हते, तो सापडताच त्यांची आर्थिक जीवनाची व साधनाची परिस्थिती बदलली. खूप मनुष्यबळ हे एक साधन. त्यासाठी खूप व बेबंद यमनक्रिया करून मनुष्यसंख्याबल उत्पन्न करून स्वसंरक्षण व वर्धन करणे हेच प्राथमिक लैंगिक संबंधांचे हेतू होते."[१५] बाही जितकी घरामध्ये जास्त असेल तितकी त्या घरातील कुटुंबप्रमुखाची

जबाबदारी वाढते. अशावेळी कुटुंबप्रमुखाने तटस्थ आणि खंबीर राहावे लागते. शिवाय कुटुंबातील सगळ्याच सदस्यांनी आपापले नियम, आपापली जागा, आपापली कामं जाणून राहायला पाहिजे. घरातील एकाही सदस्याने कामकुचराई केली तर मात्र घराचे विघटन व्हायला वेळ लागत नाही. जसे,

नवरा हुयना बायकोना बैल अन् बायको सांगील तीज हुईल

(नवरा झाला बायकोचा बैल आणि बायको सांगेल तेच होईल)

लग्नानंतर नवरा बायकोच्या म्हणण्यानुसार वागायला लागला की, लोकांच्या तोंडी ही म्हण यायला वेळ लागत नाही. 'हुयना' या डांगी शब्दाचा अर्थ 'झाला' असा होतो. 'तीज हुईल' म्हणजे तेच होईल. बैल हा शब्द एखाद्या मठ्ठ, ठोंब्या मनुष्याला उद्देशून किंवा दुसऱ्याच्या विचारानुसार वागणाऱ्या मनुष्याला उद्देशूनही वापरला जातो. याच अर्थाने येथे बैल हा शब्द वापरला आहे. म्हणजे बैलासारखा खाली मान करून बायकोचे सगळे म्हणणे ऐकून घेणाऱ्या नवऱ्याला उद्देशून ही म्हण म्हटली जाते. यातून नवऱ्याबरोबरच बायकोचीही छबी खराब होते. असे असले तरी येथील घरांत नवऱ्याबरोबरच बायकोचेही स्थान महत्त्वपूर्ण असते. घरातील प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयामध्ये तिची सहमती विचारात घेतली जाते.

स्त्रीच्या गरोदरपणात तिची खूप काळजी घेतली जाते. शक्यतो तिची प्रत्येक इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. खास करून खाण्याच्या बाबतीत विशेष काळजी घेतली जाते. म्हणूनच,

पोटाळी बायको खावला हेरह

(गरोदर स्त्री खायला बघतेय)

कोणीही काही खात असताना तिथे गरोदर स्त्री आली तर तिला 'खाते का?' असे न विसरता विचारले जाते. किंवा एखादी वस्तू तिला खावी वाटत असेल तर ती वस्तू कुठूनही आणून देण्याचा प्रयत्न केला जातो. यामागे अजून एक समज असाही आढळतो की, स्त्री खायला मागते म्हणजे तिच्या गर्भात असलेले बाळ खायला मागते. म्हणून त्या बाळाची खायची इच्छा पूर्ण केली जाते. तसे न केल्यास तिचे पोट फुटून पडेल अशीही समजूत यामागे आहे.

५. ७. ८. माणसाच्या आळशीपणावर आधारित म्हणी:

माणसाचा एक महत्त्वाचा दुर्गुण म्हणजे त्याचा आळस. या आळशीपणावर डांगमध्ये अनेक म्हणी सापडतात. त्यापैकी एक म्हणजे,

दुसरेनी आसा सदा निरासा

(दुसऱ्याची आशा सदा निराशा)

काहीवेळा माणूस स्वतःच्या कामासाठी दुसऱ्याच्या मदतीची आशा बाळगून असतो. अशावेळी ही आशा पूर्ण झाली नाही की ही म्हण सहज मुखातून बाहेर पडते. मराठीत "जो दुसऱ्यावर विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला"[१६] अशी म्हण सापडते. ही म्हण वरील म्हणीचा आरसाच आहे असे दिसते.

पदरशिवाय कदर नी

(स्वतःशिवाय कदर (मोल) नाही)

कोणतेही काम स्वतः केल्याशिवाय त्याचे मोल कळत नाही. दुसऱ्याची आशा, दुसऱ्याने केलेले काम किंवा दुसऱ्यावर विसंबून राहणे यातून त्या व्यक्तीचा आळसपणा स्पष्ट दिसून येतो. या आळसावलेल्या स्थितीतून पळवाट काढण्यासाठी मग त्याच्या तोंडी सहजच येतं,

नसीबज गांडू त काय करील पांडू

(नशीबच खोटं त्याला काय करणार)

म्हणजे आपल्या नशिबीच नाही तर त्याला काय करणार असे म्हणून तो दैवावर सगळा कार्यभाग सोपवून गप्प बसतो. एखाद्यावेळी वेळ निघून जाते किंवा वेळ जवळ येते आणि मग धावाधाव केली जाते. त्यावेळी,

हग लागह न दगड गवसताहा

(हग लागल्यावर दगड शोधणं)

जाहा गळह ताहा कळह

(जेव्हा गळतं तेव्हा कळतं)

आयत्यावेळी एखाद्या वस्तूचे महत्त्व पटते. आणि त्यावेळी धावाधाव केली जाते. पण त्याक्षणी वेळ निघून गेलेली असते हे लक्षात येते.

घरातील एखादी व्यक्ती कामचुकारपणा करत असेल तर त्याला शहाण्या माणसांकडून एखादा टोमणा मारला जातो.

अन खाहास का सेण

(अन्न खातो की शेण)

अन्न खाण्यासाठी मेहनत करावी लागते, काम करावे लागते. आळस करून चालत नाही हे या म्हणीतून सांगण्याचा प्रयत्न असतो.

५. ७. ९. इतर म्हणी:

जिनं ती जानं

(प्रसूती वेदना जिने जाणल्या आहेत तिलाच त्या कळतात)

जिनं म्हणजे प्रसूत होणे. जानं म्हणजे जाणणे, जाणून घेणे, समजून घेणे. प्रसूती वेदना जिने जाणल्या आहेत तिलाच त्या कळतात असा स्पष्ट अर्थ यातून निघतो. प्रसुतीच्या घटका ह्या कोणत्याही स्त्रीसाठी खूप कठीण असतात असे मानले जाते. स्त्री प्रसुतीच्या वेदना ह्या फक्त स्त्रीच जाणू शकते (जी कधीतरी प्रसूत झालेली असेल अशी) असे असले तरी वरील म्हण ही सर्रासपणे पुरुषांच्याही तोंडी खिळलेली असते. आता प्रसूती वेदना पुरुषांनी जाणणे किंवा अनुभवणे कोणत्याही दृष्टीने शक्य नाही.

अशावेळी ही म्हण पुरुषांच्याही तोंडी असते याचा अर्थ असा की, कोणतेही कठीणातले कठीण काम ज्याने केलेले असते त्यालाच त्या कामाचे मर्म माहीत असते. जेव्हा एखाद्याला त्या कामाचे मर्म कळत नाही, त्यावेळी त्याला समजावण्यासाठी स्त्री असो की पुरुष त्यांच्या तोंडी ही म्हण सहजपणे अवतरीत होते. या म्हणीला पर्यायी म्हण म्हणून आपण 'ज्याचे जळे त्याला कळे' ही म्हण वापरू शकतो.

जिनं ती वानं

(प्रसूती वेदना जिने सोसल्या आहेत तीच वाणते)

'जिनं ती जानं' आणि 'जिनं ती वानं' ह्या दोन्ही म्हणी प्रथमदर्शनी एकसारख्या वाटत असल्या तरी त्यांचे अर्थ वेगवेगळे आहेत. जिनं या शब्दाचा अर्थ दोन्ही म्हणींमध्ये सारखा आहे. मात्र शेवटी येणाऱ्या 'जानं' आणि 'वानं' या शब्दांवरून दोन्ही म्हणींचे अर्थ बदलतात. जानं म्हणजे जाणणे तर वानं म्हणजे वाणणे. पहिल्या म्हणीमध्ये एखाद्या कामाचे मर्म जाणून घेण्याचा आग्रह आहे तर दुसऱ्या म्हणीमध्ये त्याच कामाचे कौतुक करण्याचा, प्रशंसा करण्याचा आग्रह आहे. उदा. अंगणामध्ये दोन मुलं खेळत असता त्यांच्यात अचानक बाचाबाची झाल्याने आपापल्या मुलाच्या आईने स्वतःच्या मुलाची प्रशंसा करून दुसऱ्या मुलाला दूषणं देणे.

दिवाने आगडं आंदार

(दिव्याखाली अंधार)

'दिव्याखाली अंधार' ही म्हण मराठीतही प्रचलित आहे. दिवा हा दुसऱ्याला सतत प्रकाश देणारा असतो. परंतु त्याच्याही बुटीखाली अंधार असतो. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती कितीही सज्जन असली तरी त्याच्या ठिकाणी एखादी तरी वाईट गोष्ट असतेच. हा वाईट गुण दर्शविण्यासाठी ही म्हण वापरली जाते.

अर्दा गुंडा हिलह पोका

(अर्धा हंडा हलतो फार)

अर्ध्या हंड्याला हिसका फार. यालाच हिंदीमध्ये 'अधजल गगरी छलकत जाय' किंवा 'ओछा घडा बाजे घना' म्हणजे 'अज्ञानी या अशिक्षित व्यक्ती में गंभीरता नही होती |' असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे अर्ध्या पाण्याने भरलेल्या हंड्याला हिसका फार. त्याचप्रमाणे अर्धवट शिकलेल्या माणसाला गर्व फार. याला पर्यायी म्हण म्हणून आपण 'उथळ पाण्याला खळखळाट फार' ही म्हणही उपयोगात आणू शकतो.

५. ८. कथाबीज असलेल्या म्हणी:

काही म्हणी ह्या कथाबीजांशी खूप घनिष्ट संबंध दर्शवितात. या म्हणींची उत्पत्ती किंवा संबंध काही कथांशी, कथा प्रसंगांशी, ऐतिहासिक घटना प्रसंगांशी, त्यांच्या आचार विचारांशी मिळत्याजुळत्या असतात. प्रत्येक म्हणीमागे एखादी घटना, एखादा प्रसंग, एखादा अनुभव, एखादे तत्त्व, एखादे मूल्य दडलेले असते.

माटीना चुला माटीमां मिळह

(मातीची चूल मातीलाच मिळते)

या म्हणीचे थोडेसे विश्लेषण याआधीच केले आहे. मातीची चूल म्हणजेच मानवी देह आणि मातीलाच मिळणे म्हणजे मृत्युनंतर त्याची मातीच होणे असा आहे. मानवी शरीर मृत्युनंतर मातीलाच मिळणार हे सत्य या म्हणीतून सांगितले जाते.

आदिवासींच्या काही निर्मिती कथा किंवा उत्पत्ती कथा जर बघितल्या तर त्यातून आपल्याला वरील म्हणीच्या कथाबीजापर्यंत पोहोचता येते. ह्या कथा प्रामुख्याने पृथ्वी उत्पत्तीच्या, सृष्टी उत्पत्तीच्या, मानव उत्पत्तीच्या आणि जाती-जमातीच्या उत्पत्ती कथा आहेत. वरील म्हण ही मानव उत्पत्तीच्या संदर्भातील असल्याने आपण त्याचाच विचार करू. आदिवासींच्या कल्पनेतला मानवी देह हा प्रामुख्याने पाणी आणि माती या दोन घटकांपासून बनलेला आहे. त्यामुळे एकेकाळी पृथ्वीवर फक्त पाणीच पाणी होते ही कल्पना त्यांच्यात सर्वदूर पसरलेली दिसते. जलप्रलय, जगबुड, पाणबुड, जळींतकार, पृथ्वीला पाण्यात बुडवणे ह्या कल्पनाही त्याच्यातूनच निर्माण झाल्या आहेत.

माती हा घटकही पाण्याइतकाच महत्त्वाचा आहे. वारल्यांच्या एका लोककथेनुसार 'एकदा पृथ्वी बुडाली. पृथ्वीवरचे सगळे जीव-जनावरे, झाडे-झुडपे नष्ट झाली. देवांना पृथ्वीची पुनर्रचना करण्यासाठी माती गरजेची होती. फक्त गोमाशीकडेच मातीचे गोळे असतात, म्हणून नारणदेवाने गोमाशीकडून माती उपलब्ध करून घेतली असा कथाभाग आहे.' तर गोंडांच्या एका निर्मिती कथेत 'पृथ्वीवर जिकडे तिकडे पाणीच पाणी होते. त्यात फक्त कमळाच्या वेली व फुले होती. त्यातील एका कमळाच्या पानावर देवाचा जन्म झाला. त्या देवाने कावळा आणि खेकडा निर्माण केला. कावळ्याला माती आणण्याचे काम देवाने दिले. पण कावळ्याला माती सापडली नाही. तेव्हा त्याने ते दुःख खेकडाला सांगितले. मग खेकडाने समुद्राच्या तळाशी जाऊन 'केंचना' गांडूळ पकडून आणले. व त्याच्याकडून माती उपलब्ध करून घेतली असा कथाभाग आहे.' येथे फक्त माती उपलब्ध करून घेण्याविषयीच्या आदिवासींच्या कल्पना कशा निरनिराळ्या आहेत, ते लक्षात यावे म्हणून हे कथा विश्लेषण केले आहे.

वारली, गोंड आणि आता कोरकूंच्या मानव निर्मितीच्या कथेचा विचार करू. ही कथा डॉ. गोविंद गारेंच्या 'आदिवासी लोककथा' या संपादित पुस्तकातून जशीच्या तशी देत आहे. ''जेव्हा पृथ्वीवर कोणीच नव्हते, त्यावेळेस 'हुडिया-ओढा' या अक्षय्यवटाच्या पारावर छत्तीसकोटी देवतांची सभा भरली आणि त्याठिकाणी मनुष्यप्राण्याची निर्मिती करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यासाठी लागणारी माती कशी मिळवायची? समुद्रकिनारी राहणाऱ्या 'दीमकदेवी' जवळची माती आणण्यासाठी म्हणून 'काग भुशुंडजी'ची (कगालिया मासा) विशेष दूत म्हणून नेमणूक करण्यात आली. काग भुशुंडजीने माती आणण्याचे कबूल केले व त्यासाठी प्रयाण केले. उड्डाण करीत असताना अनेकदा त्याचे पंख झडले, अनेकदा तो थकला. थांबला पण पुन्हा त्याला पंख फुटले. अनंत अडचणींना तोंड देत मोठ्या प्रयासाने काग भुशुंडजी दीमकदेवीजवळ पोहोचला. प्रथम त्याने देवीला नमस्कार केला. देवीची मनोभावे प्रार्थना केली. आणि देवीला प्रसन्न करून देवतांची मनुष्यप्राणी निर्मितीसाठी मातीची मागणी दीमकदेवीसमोर मांडली. तेव्हा दीमकदेवीने माती देण्याचे कबूल केले पण एक अट घातली. ती म्हणजे

माझ्यापासून नेलेली माती मला परत करायची म्हणजे परतबोलीची अट. त्याप्रमाणे काग भुशुंडजीने यशस्वीपणे आणून दिलेल्या मातीपासून देवतांनी स्त्री आणि पुरुष अशा दोनप्रतिमा तयारकेल्या आणि त्या सुकण्यासाठी म्हणून ठेवून दिल्या, तर त्यांची पऱ्यांनी मोडतोड करून टाकली. रोज असेच घडायचे. देव कंटाळले. शेवटी त्या प्रतिमांच्या रक्षणासाठी देवांनी कुत्र्याची नेमणूक केली. तेव्हा त्या प्रतिमा सुकल्या. त्यांच्यात मग देवांनी प्राणाची फुंकर घातली अन् मनुष्यप्राणी निर्माण झाला. कुत्र्याची पण मैत्री तेव्हापासूनची. मात्र दीमकदेवीपासून उधार आणलेली माती परत करायची राहूनच गेली. पण ती परत करणे आवश्यक होते. ती माती आजही मृत्युनंतर शवाच्या रूपाने आपण परत करतो असा कोरकूंचा विश्वास आहे."[१७] या लोककथेत स्पष्टपणे म्हटले आहे की, उधार आणलेली माती आपण शवाच्या रूपाने परत करतो. यावरून असे सांगता येते की, 'माटीना चुला माटीमां मिळह' ही डांग प्रदेशात म्हटली जाणारी म्हण या कथेतून उत्पन्न झाली असावी.

या लोककथेप्रमाणेच कोरकूंमध्ये एक लोकगीतही सापडते. ते असे,

"छेत्तीसकोटी देवताकू दुंडिया जोडा |

छटननिजा सुबान केन ||

छेत्तीसकोटी देवताकू चोजा मनसुबा टोळेमाळ |

कगलिया मासासे उसनी माटी ||

आसिनी कुलेभेजा, कगलियामासा |

देरिया टापुन सेने छाल्या आफिरेजा ||

बनाया दाने सूरतो बन दो |

बनायो दोन, मूरतो बन दो ||

हेरोम हेरा बासो मालाय |

सेरोम सेरा मनकाय रो ||

या लोकगीताचा आशय असा, छत्तीसकोटी देवदेवता वडाच्या झाडाखाली जमल्या आणि मानवाची निर्मिती करण्यासाठी माती आणण्याचे काम त्यांनी 'कगलिया मासा' (कागभुशुंडजी) म्हणजे कावळ्याकडे सोपविले. कागभुशुंडजी समुद्रापलीकडे खूप दूर माती आणण्यासाठी गेले व त्यात त्याचे पंख झडले."[१८] हे लोकगीत अर्धवटच असले तरी त्यापुढील लोककथा देवगांवकरांनी वरीलप्रमाणेच दिली आहे. त्यामुळे 'माटीना चुला माटीमां मिळह' या म्हणीचे बीजांकुर आपल्याला उपरोक्त कथा-गीतांमधून शोधता येते.

अशाच एका ऐतिहासिक घटनेतून कथाबीज घेऊन निघालेली म्हण आपल्याला पाहता येईल. ही म्हण अशी,

कठं राजा भोज अन् कठं गंगू तेली

(कुठे राजा भोज आणि कुठे गंगू तेली)

ही म्हण डांगी बोलीबरोबरच मराठी, हिंदी आणि खानदेशी बोलीभाषेतही पाहायला मिळते. या म्हणीमागे ११ व्या शतकातील राजा भोज जे मध्यप्रांतातले एक बलाढ्य राजा होते. आणि दक्षिणेकडील कलचुरी नरेश गांगेय व चालुक्य नरेश तैलंग यांचा इतिहास आहे. राजा भोजाच्या ऐश्वर्यावर भाळून त्याच्यावर चढाई करण्यासाठी आलेल्या गांगेय आणि तैलंग यांना राजा भोज याने लढाईत चांगलाच धडा शिकवला. तेव्हापासून राजा भोजाच्या प्रजेकडून गांगेय आणि तैलंग यांना डिवचण्यासाठी, त्यांची अवहेलना करण्यासाठी 'कहाँ राजा भोज और कहाँ गांगेय तैलंग' असे उद्गार निघू लागले. पुढे याच उद्गारांचे म्हणीत रुपांतर झाले. मात्र गांगेयचे गंगू आणि तैलंगचे तेली झाल्यामुळे 'कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली' असे म्हटले जाते.

५. ९. डांग जिल्ह्यातील म्हणींचे महत्त्व:

लोककथा, लोकगीते, लोकनृत्य, लोकनाट्य इत्यादींचा ज्याप्रमाणे लोकसाहित्यामध्ये महत्त्वाचा वाटा असतो, अगदी तसाच महत्त्वाचा वाटा या म्हणींचाही असतो. म्हणी या समाजाच्या मार्गदर्शक असतात. त्यातून समाज शिक्षणाचे किंवा लोकशिक्षणाचे काम कळत नकळतपणे केले जाते. डांगच्या संदर्भात विचार करता डांग हा महाराष्ट्राशी एक अतूट नाते सांगणारा प्रदेश आहे. त्यांची डांगी बोली सोडली तर त्यांची एकूण संस्कृती महाराष्ट्राशी मिळतीजुळती आहे. म्हणूनच मराठी संस्कृतीतून उत्पन्न झालेल्या अनेक म्हणी डांगच्या लोकांनी स्वीकारलेल्या आहेत. त्या म्हणींमध्ये काहीप्रमाणात बदल घडवून आणला आहे. तर काहीवेळा जशाच्या तशा स्वीकारल्या आहेत. हा बदल येथील संस्कृतीचा जिवंतपणाच दर्शवितो.

डांगी म्हणी डांगच्या लोकसमूहाच्या संज्ञापन व्यवहारात महत्त्वाचे स्थान राखून आहेत. ह्या म्हणी कधी एखाद्याला जगण्याची उमाळी देऊन जातात तर कधी जगण्याचे महत्त्व समजावून जातात. कधी त्या हसण्या-हसवण्याचे काम करतात तर कधी गंभीर विषयाचेही उत्तर सहज सोप्या भाषेत सांगून जातात. अशा कितीतरी म्हणी डांगी आदिवासींच्या बोलण्यात वेळोवेळी येतात. इतरत्र जे म्हणींचे महत्त्व आहे तेच थोडक्यात डांग जिल्ह्यातील म्हणींचे महत्त्व आहे.

५. १०. डांग जिल्ह्यातील म्हणींचे वेगळेपण:

डांगच्या म्हणींचे वेगळेपण शोधतांना प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात येते ती ही की, त्यांची डांगी ही विशिष्ट बोली. मराठीमध्ये, हिंदीमध्ये किंवा इतर बोली भाषेमध्ये ज्या म्हणी सापडतात त्यापैकी बहुतेक म्हणी डांगी बोलीतही सापडतात. परंतु त्यांचे वेगळेपण म्हणजे त्या त्या म्हणींचे डांगी बोलीच्या वळणावर झालेले रुपांतर. डांगी बोलीत इतर बोली भाषेतील म्हणींचा स्वीकार करतांना त्यांचा आशय जसाच्या तसा ठेवलेला आहे असे दिसते. मात्र त्यांची शब्दरचना आपल्या डांगी बोलीच्या वळणावर घेतली आहे. उदा. 'दिव्याखाली अंधार' ही मराठी म्हण डांगी बोलीत घेतांना तिचे 'दिवाने आगडं आंदार' असे रुपांतर करून घेतले आहे. हे मात्र डांगी बोलीच्याच बाबतीत घडते असे नाही, तर प्रत्येक बोली किंवा भाषा दुसऱ्या बोली किंवा भाषेतून म्हणींचा स्वीकार करतांना त्यांच्यात थोडेफार बदल करूनच स्वीकारते. त्यामुळे डांगी बोली ही इतर बोली किंवा भाषेपेक्षा खूप निराळी आहे असे समजण्याचे काहीही कारण नाही.

डांगी बोलीतील लोकगीतांच्या बाबतीत मात्र तसे म्हणता येत नाही. त्यांची लोकगीते मात्र अस्सल मराठी वळणाची आहेत. यावरून असे सांगता येते की, डांगी म्हणींचे डांगीकरण झालेले दिसून येते. मात्र डांगी लोकगीतांचे डांगीकरण अजूनही झालेले दिसून येत नाही. म्हणजे डांगी म्हणींची भाषा डांगी बोली असली तरी डांगी लोकगीतांची भाषा मराठी भाषाच आहे. एकाच प्रदेशात राहणाऱ्या लोकसमूहातून असे दोन भिन्न प्रवाह वाहतांना दिसतात. हे वेगळेपण अतिशय महत्त्वाचे आहे असे मी मानतो.

५. ११. डांग जिल्ह्यातील म्हणींची सामाजिकता:

लोकसाहित्यात त्या त्या समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते असे मानले जाते. म्हणूनच लोकसाहित्य हा समाजाचा आरसा असतो. लोकसाहित्याचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे म्हण. या म्हणींच्या माध्यमातूनही समाजाचे प्रतिबिंब न्याहाळता येते. त्याचा चेहरा मोहरा ठरविता येतो. डांगी म्हणींच्या संदर्भातही आपल्याला काहीसे असेच म्हणावे लागते. या म्हणींच्या माध्यमातूनही आपण डांग प्रदेशातील समाजाचे प्रतिबिंब न्याहाळू शकतो. उदा. 'काम करं तठं अन् मांगी खा अठं' ह्या म्हणीच्या माध्यमातून आपण त्यांच्या जीवन जगण्याच्या रीतीभाती जाणू शकतो. ही म्हण ज्याअर्थी डांग प्रदेशात प्रचलित आहे त्याअर्थी तिचे महत्त्वही तिथे आहेच. या म्हणीतून त्यांची गरिबी, एका भाकरीच्या तुकड्यासाठी इथे तिथे भटकत फिरण्याची किंवा न बोलावता भाकरीच्या तुकड्यासाठी दुसऱ्याच्या घरी कामाला जाने. या सगळ्या गोष्टी भयावह आहेत. अशा पद्धतीने आपल्याला समाजाची पडताळणी करता येऊ शकते.

उखाणे व आहाणे

५. १२. उखाणे व आहाणे यातील साम्यभेद:

विविध अभ्यासकांच्या अभ्यासातून असे दिसून येते की, उखाणा आणि आहाणा या दोन्ही संज्ञा एकाच अर्थाने वेगवेगळ्या स्थळी, काळी वापरल्या जातात. उखाण्यापेक्षा आहाणा शब्द अधिक जुना आणि अतिप्राचीन असावा असेही काही अभ्यासकांचे मत आहे. पूर्वी आहाणा हा एकच शब्द जनमाणसात रूढ असावा. त्यानंतर आलेल्या उखाण्याने त्याची जागा घेऊन हळूहळू आहाणा हा शब्द मागे पडला असावा, असे सांगणेही कठीण आहे. मात्र आहाणा हा शब्द ग्रामीण भागातील बोलीभाषेत अजूनही टिकून आहे. त्यामुळेच उखाणा आणि आहाणा यात कुठलाही भेद न करता हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने प्रस्तुत अभ्यासात वापरले आहेत.

५. १३. उखाण्याचे विविध बोली आणि भाषेतील प्रतिशब्द:

"उखाणा या शब्दाला भारतात ब्राह्मोद्य, प्रश्न, कूट, आणि प्रवल्हिका किंवा प्रहेलिका हे संस्कृत प्रतिशब्द आहेत. मराठीत उखाणा हा शब्द सर्वत्र रूढ आहे. आहणा शब्द त्याच्या खालोखाल वापरतात. त्याशिवाय कोहाडा, उमान किंवा उमाण असे शब्द कुणब्यांत वापरले जातात. वारली व आगरी लोकांत कुलंगडे हा शब्द वापरतात. सिंधीत उखाणी हा शब्द सापडतो. हिंदी व बंगालीत पहेली म्हणतात. कानडीत ओगणु, ओडकथे, ओडगते, प्रहलिके, सौचिगार्थ असे पाच शब्द

आढळले. तेलुगूत विडिकथ आणि तामिळ व मल्याळममध्ये विडिकदाई आणि विडिकदा असे शब्द आहेत."[१९] "परभणी जिल्ह्यात उखाण्याला आहेणा, आयना असे शब्द वापरले जातात. तर नांदेड जिल्ह्यात सास्तर हा शब्द सापडतो."[२०] "गुजरातीमध्ये उखाणां आणि मध्यकालीन गुजरातीमध्ये समस्या आणि कूट असे दोन शब्द सापडतात."[२१] आणि डांग प्रदेशातील डांगी बोलीत उखाण्यासाठी 'घूड' आणि 'जिखण्या' असे दोन शब्द वापरतात. हे सगळे शब्द एकाच अर्थाने वेगवेगळ्या बोली किंवा भाषेत वापरले जातात. महाराष्ट्रातील नाव घेण्याचे उखाणे सोडले तर बाकीचे कूट प्रश्नाच्या स्वरूपातील उखाणे सर्वत्र सापडतात. वरील वेगवेगळ्या बोली किंवा भाषेतील शब्द हे कूट किंवा कोडे याच अर्थाने वापरले जातात.

५. १४. उखाण्याची प्राचीनता:

मराठी लोकसाहित्यातील कोणत्याही वाङ्मय प्रकाराच्या खाणाखुणा आपल्याला वेद वाङ्मयापासून शोधाव्या लागतात. लोकगीते, लोककथा, तंत्र-मंत्र, म्हणी याप्रमाणेच उखाण्याच्याही खाणाखुणा वेद वाङ्मयात सापडतात. ब्रह्मोद्य हा वेद वाङ्मयातील सर्वांत प्राचीन शब्द असून तो उखाण्याच्या रुपात आलेला आहे. तत्कालीन ऋषी, मुनी यज्ञाच्या वेळी ज्या उक्ती साधायचे त्यातून या उखाण्याचे मूळ शोधता येते. ब्रह्मोद्यानंतर कूट, प्रवल्हिका किंवा प्रहेलिका असे अनेक संस्कृत शब्द वापरले गेले.

नंतरच्या महाभारतातील युधिष्ठीर आणि यक्ष यांच्या दरम्यान झालेल्या संवादातूनही उखाण्याचे रूप न्याहाळता येते. त्याकाळी एका प्रकारची स्पर्धाच असायची. जो त्या स्पर्धेत जिंकेल तो सर्वश्रेष्ठ समजला जात असे. आणि जो हरेल त्याला जिंकलेल्याची गुलामी, शिष्यत्व किंवा मृत्युदंडही स्वीकारावे लागत असे. म्हणजे त्याकाळी कूट प्रश्नांना समाजात अतिशय महत्त्व होते.

ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतही एक ओवी सापडते. तसेच एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवरात अध्याय १५ ते १८ यात रुक्मिणीच्या तोंडून कृष्णाचे नाव घेण्याचे उखाणे सापडतात.[२२] त्यानंतर लावणीचा एक प्रकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या सवाल जवाब किंवा कलगीतुऱ्याच्या लावणीत ह्या कूट प्रश्नांचे किंवा उखाण्यांचे दर्शन होते.

५. १५. नाव घेण्याचेउखाणे डांग जिल्ह्यात सापडत नाहीत:

भारतातील बहुतांश प्रांतातील स्त्रिया स्वतःच्या पतीला नावाने हाक मारत नाहीत. त्याऐवजी त्या आपल्या मुलाचे अथवा मुलीचे नाव मध्य घालून हाक मारतात. उदा. छोटूचे बाबा, टिंकूचे पप्पा इत्यादी. तर काहीवेळा ओ, अहो, ऐकलं का?, मी काय सांगतेय? असे शब्द वापरून हाक मारतात. पत्नीने स्वतःच्या पतीचे नाव घेतले तर आयुष्य कमी होते. किंवा पतीच्या आयुष्यात विघ्न निर्माण होते अशी समजूत यापाठीमागे आहे. डांगमध्येही ही प्रथा तुरळक ठिकाणी पाहायला मिळते. मात्र महाराष्ट्रातील स्त्रियांना आपल्या पतीचे नाव घ्यायचेच असेल तर विशिष्ट रूपकाच्या आडून ते नाव घ्यावे लागते. यालाच आपण नाव घेण्याचे उखाणे किंवा आहाणे म्हणतो. या प्रथेचे दर्शन एखाद्या लग्नसोहळ्यात अथवा सण-उत्सवात होते. यात नववधू, वर, व्याही, विहीण, वराचे मित्र, वधूच्या मैत्रिणी, साली इत्यादींची महत्त्वाची भूमिका असते. यामध्ये फक्त पतीचेच नाव घेतले जाते असे नाही.

तर व्याही, विहीण, मित्र, मैत्रिणी हेही चेष्टेच्या स्वरुपात, एकमेकांची खोडी काढण्यासाठी उखाण्याचा वापर करतात. मात्र ही प्रथा आता काळाच्या पडद्याआड चाललेली दिसते.

डांगमधील स्त्रिया इतर ठिकाणच्या स्त्रियांहून, त्यातच खास करून महाराष्ट्रातील स्त्रियांहून अधिक मोकळया स्वभावाच्या आहेत असे म्हणता येते. त्यांच्या घरात त्या अधिक मोकळेपणाने राहू शकतात, याचे कारण त्या सासरे, जेठ, जावई इत्यादींच्या समोर डोक्यावरूनपदर घेत नाहीत. त्यांच्यातील नाते अधिक मोकळेपणाचे आहेत असे यावरून म्हणता येते. त्या खऱ्या अर्थाने सासऱ्याला वडिलांच्या जागी, दीराला लहान भावाच्या जागी, जेठाला मोठ्या भावाच्या जागी आणि जावयाला मुलाच्या जागी ठेवतात. याच नात्यामुळे त्या अधिक मोकळया स्वभावाने घरात वावरू शकतात. वेळ प्रसंगी त्या आपल्या पतीच्या नावाने पतीला हाकही मारतात.

थोडक्यात स्वतःच्या पतीचे नाव घेणे कोणत्याही दृष्टीने गैर नाही असे डांगमधील स्त्रियांना वाटते. याच कारणास्तव डांगमध्ये स्त्रियांच्या मुखी नाव घेण्याचे उखाणे किंवा आहाणे सापडत नाहीत. व्याही किंवा विहिणीचे नाव घेण्याचे उखाणेही सापडत नाहीत. नुसते डांग जिल्ह्यातच नव्हे तर "सबंध गुजरात राज्यात उखाण्यातून नाव घेण्याची प्रथा नाही."[२३] येथे प्रामाणिकपणे असे नोंदवावेसे वाटते की, डांग जिल्ह्यातील प्रथा, परंपरा, चालीरीती, सण-उत्सव, कथा, गीते या सगळयांची बैठक महाराष्ट्राच्या मातीशी जोडलेली आहे. मुळात येथील संस्कृती ही महाराष्ट्रीय संस्कृती आहे असेही मी याआधी म्हटले आहे. या संस्कृतीचे मूळ कोकणाशी अधिक जवळचे आहे. कारण येथील समाज पूर्वी कोकणातून स्थलांतरित झाल्याची नोंद सापडते. असे असले तरी खास महाराष्ट्रीय नाव घेण्याच्या उखाण्याची पद्धत येथे पाहायला मिळत नाही. महाराष्ट्रातील बहुतेक सर्वच बोली आणि भाषेत नाव घेण्याचे उखाणे सापडतात. मात्र त्याला डांगी समाज आणि त्यांची डांगी बोली याला अपवाद आहे असे म्हणावे लागेल.

५. १६. डांग जिल्ह्यातील उखाणे:

डांग जिल्ह्यात आढळणारे उखाणे किंवा आहाणे हे प्रामुख्याने शेतीशी निगडीत, पशु-पक्ष्यांशी निगडीत, मानवी शरीराशी निगडीत, निसर्ग सृष्टीशी निगडीत आणि घरोपयोगी विविध वस्तूंशी निगडीत असे उखाणे आहेत. याशिवाय इतरही विविध वस्तूंशी निगडीत हे उखाणे आपल्याला डांग जिल्ह्यात पाहायला मिळतात. अभ्यासाच्या सोयीसाठी उपरोक्त विविध विषयानुसार उखाण्यांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. हे प्रयत्न करत असतांना असे वेळोवेळी जाणवते की, काही उखाणे हे कोणत्याही एकाच पठडीच्या वर्गीकरणात बसवता येत नाहीत. त्याचा आशय नीट लक्षात घेता आपण एकाच उखाण्याचे अनेक प्रकारांमध्ये त्याचे स्थान निश्चित करू शकतो. परंतु असे करणेही योग्य वाटत नाही. कारण अशावेळी पुनरावृत्तीचा धोका निश्चितच संभवतो. त्यामुळे वर्गीकरण करतांना ते काटेकोरपणे केले जाईलच असे नाही.

उखाणे हे प्रश्नोत्तराच्या स्वरुपात म्हटले जातात. येथे वर्गीकरण करतांना त्याच्या प्रश्नाचा विचार केलेला नाही. कारण प्रश्नातून एखादा वेगळाच आशय व्यक्त केला जातो. परंतु त्याचे उत्तर मात्र वेगळाच आशय व्यक्त करत असते. अशावेळी या प्रश्नांबद्दलच प्रश्न उभा राहतो. परंतु त्यांचा अधिकाधिक विचार केला तर आपल्याला असे दिसते की, हे सगळे प्रश्न कूट प्रश्न असतात. म्हणजे

त्यामध्ये काहीतरी छुपा भाग असतो. हा छुपा भाग कोणता तर त्याचे उत्तर. हे उत्तर विशिष्ट पद्धतीने त्या प्रश्नाच्या आड लपवलेले असते. हा लपवलेला भाग अतिशय महत्त्वाचा असून तो त्याचा आत्माच असतो. ज्याप्रमाणे एखाद्या शरीरात आत्माच नसेल तर ते शरीर काही कामाचे नसते. त्याचप्रमाणे एखाद्या उखाण्याचे किंवा कूट प्रश्नाचे उत्तर माहीत नसेल तर त्या उखाण्याचा काहीही उपयोग नाही. म्हणून मी येथे हा आत्मा किंवा उखाण्याचे उत्तर समोर ठेवून वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

५. १६. १. शेतीविषयक डांगी उखाणे:

भारत हा शेतीप्रधान देश आहे असे आपण म्हणतो. म्हणजेच शेती हा प्रमुख व्यवसाय भारतीयांचा आहे. त्यात डांग जिल्हाही त्याला अपवाद आहे असे नाही. परंतु काही दशकांपूर्वी डांग जिल्ह्यातील आदिवासींचा प्रमुख व्यवसाय हा शिकार करणे होता असे म्हणता येईल. कारण त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शिकार करणे हेच होते. आता मात्र शिकारीकडून शेतीकडे येथील आदिवासी वळलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनात आता शेती हा महत्त्वाचा व्यवसाय बनला आहे. ह्या शेतीला येथील आदिवासी किती कल्पकतेने पाहतात ते काही उखाण्यांतून दाखवून देता येते. अर्थातच कोणत्याही शेतीची सुरुवात नांगरणीपासून होते. त्यामुळे सुरुवातीलाच आपण नांगराविषयी उखाणा बघू. तो असा,

वाकी तुकी कुहू बाय, तीन डोके दाहा पाय?

उत्तर: आऊत (औत/नांगर)

विश्लेषण:

वाकी तुकी/तिकी: नांगराने जमिनीवर ओढलेल्या वाकड्यातिकड्या रेषा

कुहू बाय: कोकिळा

तीन डोके: दोन बैलाचे आणि एक माणसाचे मिळून तीन डोके किंवा मस्तक

दाहा पाय: दोन बैलाचे आणि एका माणसाचे मिळून दहा पाय.

ज्यावेळी एखाद्या शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये नांगर जुंपले असेल, त्यावेळी त्याला बघून तिथे उपस्थित असणाऱ्या एखाद्या विद्वान माणसाने किती सुंदर कल्पना केली असेल. त्या नांगराने जमिनीवर ओढल्या जाणाऱ्या वाकड्यातिकड्या रेषा, त्याचवेळी एखादी कोकिळा आंब्याच्या झाडावर बसून ‘कुहू...कुहू...’ करत असलेली त्याने ऐकली असेल, दोन बैलाच्या दोन डोक्या (डोके) आणि नांगर हाकणाऱ्या माणसाची एक डोकी अशा मिळून तीन डोक्या. आणि दोन बैलाचे मिळून आठ पाय आणि नांगर हाकणाऱ्या माणसाचे दोन पाय असे सगळे मिळून दहा पाय. हे सगळे वातावरण बघून एखाद्या माणसाच्या सहज तोंडातून निघाले असेल, ‘वाकी तुकी कुहू बाय, तीन डोके दाहा पाय.’ याचे उत्तर ‘आऊत’ (औत) असे दिले जाते.

वरील उखाण्यातून संख्याशास्त्राचेही ज्ञान प्रदान केले जाते. ज्यावेळी लोक अशिक्षित होते त्यावेळीसुद्धा अशा कूट प्रश्नातून संख्याशास्त्रासारख्या अति कठीण विषयाला सहज सोपे करून

मनोरंजक रीतीने शिकवले जात होते. कुठल्याही माणसाला हे उत्तर पटेल असे आहे. दुसऱ्या एका उखाण्यातून शेतीविषयी अद्भुत कल्पना केलेली दिसते.

वडला पारोंबी, पारोंबीला पेटी, पेटीमा बाळ?

उत्तर: भुयमुग (भुईमुग)

विश्लेषण:

वडला परोंबी: भुईमुगाच्या मुळया

पारोंबीला पेटी: भुईमुगाच्या शेंगा

पेटीमा बाळ: शेंगदाणे

भुईमुग हे आजच्या लोकजीवनात अतिशय महत्त्वाचे पिक असून त्यावर एक सुंदर उखाणाही आपल्याला डांग जिल्ह्यात पाहायला मिळतो. या उखाण्यातून वडाचे झाड आणि भुईमुगाचे झाड यांच्यात साम्यता दर्शविण्याचा अद्भुत प्रयत्न केला आहे. ज्याप्रमाणे वडाच्या झाडाला पारंब्या असतात काहीशा तशाच पारंब्या भुईमुगाच्या झाडाला असतात. परंतु आपण त्यांना पारंब्या म्हणत नाही. तर त्यांना भुईमुगाच्या मुळया म्हणतो. अर्थात वडाच्या झाडाला असणाऱ्या पारंब्याही एका अर्थाने वडाच्या मुळयाच असतात. परंतु आपण त्यांना मुळया न म्हणता पारंब्या म्हणतो. हा शब्दांचा खेळ सोडला तर वडाची पारंबी आणि भुईमुगाची मुळी यात खूप साम्य आहे. वडाच्या पारंबीचा आणि भुईमुगाच्या मुळीचा रंग एकसारखाच असतो. दोघांची वाढ होण्याची दिशा वरून खाली जमिनीकडे असते. दोघांच्या टोकाला कोवळा भाग असून तो पांढरट असतो. वडाचे झाड आणि भुईमुगाचे झाड यांचे आकार लहान मोठे असले तरी दिसायला दोघेही झुपकेदार दिसतात. थोडक्यात आपण कल्पना केली की, वडाचे झाड जर भुईमुगाच्या झाडाइतके असते तर कसे दिसते? त्यावेळी मनात येते की, वडाचे झाड जर लहान असते तर ते नक्कीच भुईमुगाच्या झाडासारखे दिसते. हे वडाचे आणि भुईमुगाचे साम्य झाले. इथून वडाचा आणि भुईमुगाचा संबंध तुटतो.

पुढे वडाच्या पारंबीला पेटी असे म्हटले आहे. ही पेटी म्हणजेच भुईमुगाला येणारी शेंग. आणि पुढे अजून म्हटले आहे की, पेटीत बाळ. हे पेटीतले बाळ म्हणजेच त्यातील शेंगदाणे. पेटीतल्या बाळाची कल्पनासुद्धा किती प्रभावीपणे केली आहे. बाळ जसे येणाऱ्या पिढीला नवीन जन्म देणारे असतात. तसेच हे दाणेसुद्धा येणाऱ्या पिढीला नवीन जन्म देणारे असतात. म्हणजेच तेही सजीव असतात. नाहीतर बाळाच्या ऐवजी खडे, दगड असेही काही शब्द वापरले असते. परंतु तसे केले नाही. त्यामुळे ही कल्पकता किती प्रभावी आहे हेच यातून सिद्ध होते.

दुसऱ्या एका उखाण्यातून हरभऱ्याविषयी सुंदर कल्पना दिसून येते. तो उखाणा असा,

पारी कोंबडी खारा मास, आंडा घालं सपनास?

उत्तर: हरबरा (हरभरा)

विश्लेषण:

पारी कोंबडी: पाऱ्या कोंबडीसारखा हरभऱ्याचा रंग (पांढरट-पिवळट-तांबडट असा काहीसा मिश्र रंग)

खारा मास: हरभऱ्यावर असणारा खारेपणा

आंडा घालं सपनास: हरभऱ्याला येणारे घाट

हरभऱ्याच्या शेताचे नीट निरीक्षण करता आपल्याला वरील उखाण्याचे मर्म सहज लक्षात येते. हरभऱ्याच्या शेतावर खूप खारेपणा असतो. हरभऱ्याचे झाड उगवते तेव्हापासूनच त्याच्यावर हा खारेपणा साचलेला असतो. (येथे एकाच हरभऱ्याच्या झाडाचे वर्णन करावयाचे असल्याने मी हरभऱ्याचे शेत न म्हणता हरभऱ्याचे झाड म्हणत आहे हे लक्षात घ्यावे.) हे झाड अडीच तीन महिन्यानंतर पाऱ्या कोंबडीसारखे म्हणजेच काहीसे पांढरट, पिवळट आणि तांबडट रंगाचे होते. आणि शेवटी ‘आंडा घालं सपनास’ असे जे म्हटले आहे. त्याचा अर्थ हरभऱ्याच्या झाडाला येणारे अनेक घाट. हरभऱ्याच्या घाटाला अंड्याची उपमा दिली आहे. आणि ‘सपनास’ मधला ‘स’ काहीही अर्थ सूचित करत नाही. अर्थात तो शब्द फक्त ‘पन्नास’ असाच आहे. परंतु डांगी बोलीमध्ये ‘पन्नास’ शब्द उच्चारतांना ‘स’ प्रत्यय लावला आहे.

हरभऱ्यावरून अजून एक उखाणा डांगमध्ये सापडतो तो असा,

एक खोलीमा दोन शिपाय?

उत्तर: हरबरा (हरभरा)

विश्लेषण:

एक खोलीमा: एका खोलीत म्हणजे एका टरफलाच्या आत

दोन शिपाय: एका टरफलाच्या आत असणारे दोन हरभऱ्याचे दाणे

एका हरभऱ्याच्या टरफलाच्या किंवा घाटाच्या आत एक, दोन किंवा तीन दाणे असतात. त्यातही बहुतेक घाटात दोन दाणे पाहायला मिळतात. त्यामुळे एका खोलीत दोन शिपाई अशी कल्पना केलेली दिसते.

हरभऱ्याच्याच जातीतली एक शेती म्हणजे मसुरीची शेती. ग्रामीण भागात बहुतेक वेळा हरभऱ्याची आणि मसुरीची पेरणी एकाच वेळी होते. या मसुरीच्या शेतावरही एक उखाणा मला पाहायला मिळाला आहे. तो असा,

उलूशी नार, तेवर घुंगुरना भार?

उत्तर: मसूर

विश्लेषण:

उलूशी नार: मसुरीचे लहानसे झाड

तेवर घुंगुरना भार: त्यावर घुंगराचा भार

मसुरीचे झाड जमिनीपासून एक ते दीडच वीत वाढते. म्हणजे अगदी लहान झाड असते. मसुरीच्या ह्याच आकाराला उद्देशून उलूशी नार असे म्हटले आहे. या मसुरीच्या झाडाला लहान लहान खूप घाट असतात. जणूकाही ते घुंगुरच आहेत असाच काहीसा भास व्हावा. या एका एका घाटात एक किंवा दोनच दाणे असतात. परंतु हे झाड पूर्ण घुंगराने भरल्यासारखे वाटते. म्हणून उलूशी नार, त्यावर घुंगराचा भार असे म्हटले आहे.

मिरचीवरही एक उखाणा डांगमध्ये आढळून येतो. तो असा,

तंगून चारणीन आनी तिना कानभरी कुंदला?

उत्तर: मिरची

विश्लेषण:

तंगून चारणीन आनी: तिकडून चारणीन आली

तिना कानभरी कुंदला: तिचे कानभर कुंदलं

मिरचीच्या झाडाला मिरच्या खूप लागल्याला पाहून ही कल्पना सुचली असावी. जसे मसुरीच्या झाडाला घुंगरासारखे खूप घाट बघून घुंगराची कल्पना तशी येथे मिरचीच्या झाडाला लागलेल्या खूप मिरच्या बघून कानातील कुंडलाची (कुंदलाची) कल्पना सुचली असावी.

अळूच्या पानावर पावसाळ्यात पावसाचे पाणी साचलेले किती सुंदर दिसते. जणूकाही मोतीबिंदूच त्यावर वाऱ्याच्या झुळूकेनिशी डोलत असतात. त्यालाच एका उखाण्यात सोन्याचा गोटा असे संबोधण्यात आले आहे.

सागीना सोटा, तेवर पानाना मोटा, तेवर सोनाना गोटा?

उत्तर: अळू/आळू

विश्लेषण:

सागीना सोटा: सागाच्या झाडासारखे सरळ असलेले अळूच्या पानाचे देठ

तेवर पानाना मोटा: त्या देठावर असलेले अळूचे पान

तेवर सोनाना गोटा: अळूच्या पानावर साचलेले पाण्याचे थेंब

अळूचे पान कितीही पाऊस पडत असला तरी कोरडेच असते. जसे कमळाचे झाड पाण्यात असूनही पाण्याच्या पृष्ठभागावरचे पान कोरडेच असते तसे. ह्या अळूच्या पानावर पावसाळ्यात पाण्याचे सुंदर थेंब साचलेले असतात. ते थेंब बघतांना वाऱ्याच्या हालचालीनुसार इकडे तिकडे पळण्याचा भास होतो. त्यामुळेच अशा अळूच्या मोठ मोठ्या पानांवर खेळणाऱ्या या पाण्याच्या थेंबांना सोन्याचे गोटे म्हणून संबोधले आहे.

५. १६. २. प्राणी, पक्षी व कीटकांविषयक डांगी उखाणे:

डांग जिल्हा हा जंगलांनी युक्त डोंगर टेकड्यांनी भरलेला आहे. ज्या ठिकाणी जंगल, डोंगर-टेकड्या, दऱ्या-खोऱ्या असतील त्या ठिकाणी साहजिकच विविध प्रकारचे प्राणी, पक्षी आणि कीटकांचा वावर असणारच. या जंगलातही वाघासारख्या हिंस्र प्राण्यापासून विंचवासारख्या अति लहान पण विषारी प्राण्याचाही वावर असतो. मोर, पोपट अशा परिचित पक्ष्यापासून तर अनेक अपरिचित पक्षी या जंगलात आढळतात. शिवाय येथील आदिवासी हे शेतकरी असल्याने त्यांच्याकडे अनेक पाळीव पशु पक्षी असतात. त्या सर्वांचा समावेश ते उखाण्यांमध्ये मोठ्या खुबीने करतांना दिसतात.

आठ अठींगडा, बारा फटींगडा, चार चऊकडा, दोन आकडा?

उत्तर: कुत्री, वाघीण, गाय अन् बकरीना थाना

विश्लेषण:

आठ अठींगडा: कुत्रीचे आठ स्तन

बारा फटींगडा: वाघिणीचे बारा स्तन

चार चऊकडा: गायीचे चार स्तन

दोन आकडा: बकरीचे दोन स्तन

कुत्री, गाय आणि बकरीचे स्तन किंवा आचळ यांची संख्या आपल्याला माहीत असते. कारण ते आपल्या अवतीभोवतीच असतात. परंतु वाघिणीच्या स्तनांची संख्या आपल्याला माहीत नसते. मी इंटरनेटसारख्या महाजालावरही 'वाघिणीच्या स्तनांची संख्या किती?' या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु मला समाधानकारक उत्तर कुठेही मिळाले नाही. यावरून येथील आदिवासींची निरीक्षण शक्ती किती प्रबळ आहे हे लक्षात येते.

पुडं काटकोट, मागं नातगोत?

उत्तर: पिलावाळी (पिल्लाळी) कोंबडी

विश्लेषण:

पुडं काटकोट: पुढे 'कॉट... कॉट...' असा आवाज करत चाललेली कोंबडी

मागं नातगोत: मागे चाललेली कोंबडीची पिल्ले

एखादी स्त्री जसे आपल्या तीन चार लहान लहान मुलांना मागे पुढे घेऊन चालते तशीच काहीशी ही कोंबडीही आपल्या दहा पंधरा पिल्लांना मागे पुढे घेऊन चालते. ही पुढे पुढे चालते आणि कॉट... कॉट... असा आवाज काढते. म्हणूनच या उखाण्यात 'पुडं काटकोट' असे म्हटले आहे. मध्येच ती थांबते आणि पायाच्या नखड्यांनी जमिनीवर अथवा कचऱ्याच्या ढिगाऱ्यात काहीतरी उकरून शोधते. आणि पिल्लांना कसे उकरायचे हेही शिकवते. पिल्लेही तिचीच नक्कल करताना पाहायला मिळतात. हा सगळा गोतावळा पाहिला की, वरील उखाण्याची सत्यता पटते.

बदी बदी गाय तेना चित्राला पाय, मोठा मोठा सावकार बोंबलत जाय?

उत्तर: ईचू (विंचू)

विश्लेषण:

बदी बदी गाय तेना चित्राला पाय: विंचूचे विशिष्ट पाय किंवा नांगे

मोठा मोठा सावकार बोंबलत जाय: विंचूचे विष प्रत्येकाला चढते

सापाच्या जोडीला सतत विंचवाचा उल्लेख केला जातो. कारण दोघेही विषारी प्राणी आहेत. परंतु सापाप्रमाणे विंचवाचे विष घातक नसते. सापाच्या विषाने ग्रामीण भागात अनेक माणसे मरण पावतात. त्याप्रमाणात विंचवाने दंश केल्याने कोणी मनुष्य मरण पावल्याचे माझ्यातरी ऐकिवात नाही. परंतु विंचू बिनविषारी असतो असे म्हणणेही चुकीचे आहे. कारण मनुष्य जरी मेलेला मी पाहिला नाही तरी तो विंचवाच्या दंशामुळे मरणावस्थेपर्यंत जातांना मी पाहिले आहे. शिवाय बकरी विंचवाच्या विषाने मेलेली मी पाहिली आहे. (अर्थात प्रत्यक्ष विंचू चावतांना मी पाहिले नाही.) त्यामुळे विंचवाच्या विषाचा निश्चितच माणसावर परिमाण होतो. मग तो सामान्य माणूस असो वा कोणी शेठ सावकार असो, त्याला विंचू चावला तर तो नक्कीच बोंबलत जाणार.

विंचवाच्याच जातीतला एक छोटासा प्राणी म्हणजे घोण. यालाच काही ठिकाणी गोम असेही म्हटले जाते. हाही प्राणी विषारी असतो असे म्हटले जाते. परंतु त्याची सत्यता अजून पटलेली नाही. किमान मलातरी अजून तशी निश्चित माहिती नाही. परंतु ग्रामीण भागातील लोक या प्राण्याला खूप घाबरतात. त्यावरील एक उखाणा असा,

अलगत कोंबडी करगत जाय, सोळा सिनगार बत्तीस पाय?

उत्तर: घोण

प्रस्तुत उखाण्यात 'अलगत कोंबडी करगत जाय' या ओळीतून विशेष भाव उत्पन्न होत नाही. ही सुरुवातीची ओळ फक्त यमक साधण्यासाठी योजलेली आहे असे वाटते. कारण घोणीचा आणि या ओळीचा कोणत्याही पातळीवर मेळ बसत नाही. त्यांच्यात साम्यता कुठेही दिसत नाही. 'सोळा सिनगार' म्हणजे सोळा शृंगार याचाही काही संबंध दिसून येत नाही. मात्र या उखाण्याचा सगळा सार शेवटच्या दोन शब्दांमध्ये एकवटला आहे. ते म्हणजे 'बत्तीस पाय' यामध्ये. या प्राण्याला बत्तीस पाय असतात असे म्हटले जाते. ह्या प्राण्याचे हेच वैशिष्ट्ये लक्षात घेऊन हा उखाणा तयार झाला आहे. हा प्राणी जमिनीवर सरपटणारा असून तो कुठल्याही लहान फटीत सहज शिरून लपून जातो. ही घोण शरीराच्या ज्या ठिकाणी चावते त्या ठिकाणी घोणीचे आकार उमटते असा समज आहे. मात्र याला कुठेही पुरावा सापडत नाही.

मोठे आखडाला ढोंगी डोसी चढं?

उत्तर: कोकली (लहान झिंगा)

विश्लेषण:

मोठे आखडाला: मोठ्या कड्याला/खडकाला

ढोंगी डोसी चढं: झिंगा चढे

पावसाळयात येथील नद्या दुथडी वाहतात. या वाहणाऱ्या पाण्यात अनेक प्रकारचे मासे चढतात. त्यांच्याबरोबरच झिंगेही चढतात. पावसाच्या परतीला नद्यांचे, नाल्यांचे पाणी कमी होते. अशावेळी मासे, झिंगे पाण्याच्या प्रवाहाबरोबर खाली येतात. अशावेळी अनेक आदिवासी माशांची आणि झिंग्यांची शिकार करतात. हा अनुभव त्यांनी वरील उखाण्यातून प्रकट केला आहे. एखादीडोसी म्हणजेच म्हातारी ज्याप्रमाणे कंबरेत वाकलेली असते. त्याचप्रमाणेझिंगाहीकंबरेत वाकलेला असतो. हे साम्य लक्षात घेऊन प्रस्तुत उखाण्याची निर्मिती केलेली दिसते.

याच पठडीतला अजून एक उखाणा सापडतो तो असा,

मोठे आखडाला चुंबळो राजा चढं?

उत्तर: खटखुबा (गोगलगाय)

विश्लेषण:

मोठे आखडाला: मोठ्या कड्याला/खडकाला

चुंबळो राजा चढं: गोगलगाय चढे

पावसाळयात आणि क्वचितच हिवाळयात गोगलगाय पाहायला मिळते. ती एखाद्या खडकाला, दगडाला किंवा झाडाला कुठेही पाहायला मिळते. हा प्राणी खूप गरीब मानला जातो. म्हणूनच एखाद्या गरीब स्वभावाच्या माणसालासुद्धा आपण गरीब गाय असे म्हणतो. गोगलगायीच्या पाठीवर एक कठीण कवच असते. गोगलगायीला कुठलाही धोका आढळून आल्यास ती त्या कवचात लुप्त होते. ह्या कवचाला चुंबळीसारखे भासवून त्याचे वर्णन या उखाण्यात केले आहे. कारण हे कवच चुंबळीसारखे, वेटोळे घातल्यासारखे दिसते. म्हणून येथे चुंबळो राजा असे म्हटले आहे.

काळी गाय काळे घरमं रहं, लाल पाणी पेहे, सफेद आंडू देहे?

उत्तर: जू (ऊ)

विश्लेषण:

काळी गाय काळे घरमं रहं: काळी गाय काळ्या घरात राहते

लाल पाणी पेहे: लाल पाणी पिते

सफेद आंडू देहे: सफेद अंडे देते

ग्रामीण भागात काही वर्षांपूर्वी सकाळच्या कोवळया उन्हामध्ये स्त्रिया आपल्या मुलांना, मुलींना बळजबरीने धरून बसवायच्या आणि त्यांच्या डोक्यातील उवा काढायच्या. तर काहीवेळा त्या आपापसातील केस विंचरून देता देता उवा काढत बसायच्या. एका प्रकारे त्यांच्या कामाचाच तो

एक भाग असायचा. हे दृश्य गावोगावी दिसायचे. परंतु काही वर्षांपासून ह्या उवांचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे वरील प्रकारचे दृश्य आता सहसा कुठे पाहायला मिळत नाही. पूर्वी अंघोळ वेळेवर नसायची, कपडे वेळेवर धुतलेले नसायचे. थोडक्यात स्वच्छतेच्या बाबतीत ते खूप मागे होते. अस्वच्छ असल्याने त्यांच्या डोक्यात आणि क्वचित त्यांच्या कपड्यांनाही ह्या उवा असायच्या. केस स्वच्छ धुतले नाही की, त्यामध्ये मळ तयार होतो. या मळामुळे उत्पन्न होणारा सहा पायांचा आणि काटेरी सोंडेचा जो किडा असतो त्यालाच ऊ म्हणतात. ह्या उवेचे काही वैशिष्ट्ये लक्षात घेऊन हा उखाणा तयार करण्यात आला आहे. या उखाण्यात काळी गाय डोक्यातील ऊला म्हटले आहे. काळे घरमं रहं म्हणजे काळ्या केसांमध्ये राहते. लाल पाणी पेहे म्हणजे माणसाचे रक्त जे लाल असते ते पिते. आणि सफेद अंडे देते. या अंड्यांना बेरड (डांगमध्ये बेर्डा) असेही म्हणतात.

काळी गाठी वाटला चालं?

उत्तर: तेरुली मुंगी

विश्लेषण:

काळी गाठी: काळे मिठले (काळ्या मण्यांची माळ)

वाटला चालं: वाटेला चालते

मुंगी कोणालाही अपरिचित आहे असे नाही. मात्र मुंग्यांमध्येही अनेक जाती पाहायला मिळतात. त्यांचा आकार थोडाफार लहान मोठा असतो. रंगही तांबडा, काळा, पांढरट, तपकिरी असा वेगवेगळा असतो. त्यापैकीच एक म्हणजे तेरुली मुंगी. ही काळ्या रंगाची असते. शरीराने पुढून मागेपर्यंत एकसारखीच असते. तिच्या तोंडाजवळ बारीक पण तीक्ष्ण, टोकदार दोन नांगे असतात. तिच्या भक्ष्याला याच नांग्यांच्या सहाय्याने कुरतडून खाल्ले जाते. ह्याच नांग्यांनी माणसाचा चावा घेतला तर खूप वेदना होतात. चावा घेणाऱ्या मुंग्यांपैकी ही एक मुंगी असते. ह्या मुंग्या शक्यतो जंगलातच आढळतात. घरात त्या कधी आढळत नाहीत. ह्या मुंग्या वाटेवर चालत असताना एका ओळीने चालतात. त्यांचा रंग काळा असतो. त्यामुळे त्या चालत असतांना एखादी गळ्यातील काळ्या रंगाची पोत पडली आहे असा भास होतो.

५. १६. ३. मानवी शरीराविषयी डांगी उखाणे:

मानवी शरीर हे वैशिष्ट्येपूर्ण आहे. जगात कोट्यवधी लोकं असूनही ते एकमेकांसारखे दिसत नाहीत. प्रत्येकामध्ये काहीना काही बदल आहे हे त्यापैकीच एक वैशिष्ट्ये म्हणता येईल. डांगी उखाणेही मानवी शरीराविषयी काही वैशिष्ट्ये ध्यानात घेऊन तयार झालेले आहेत. बहुतेकवेळा ही वैशिष्ट्ये आपल्यालाही माहीत असतात. परंतु उखाण्यातून अशा काही विशिष्ट पद्धतीने ती गुंफलेली असतात की ती आपल्याला पटकन लक्षात येत नाहीत. डोळ्यासंबंधी असाच एक डांगी उखाणा पाहता येईल.

दोन खोलीमां दोन भाय एकून मेराला हेरायजत नीही?

उत्तर: डोळा

विश्लेषण:

दोन खोलीमां दोन भाय: दोन खोल्यांमध्ये दोन भाऊ

एकून मेराला हेरायजत नीही: एकमेकांना पाहू शकत नाही

आपले डोळे इतके विचित्र आहेत की, त्या डोळ्यांच्या सहाय्याने आपण सगळे जग, सगळे विश्व पाहू शकतो. पण त्या डोळ्यांचे दुर्दैव असे की, ते दोघे डोळे एकमेकांना पाहू शकत नाहीत. त्यांच्यात अंतरही खूप आहे असे नाही. म्हणून येथे एकाच घरातील दोन खोल्यांमध्ये राहणारे दोन भाऊ असे म्हटले आहे. 'डोळा' हा शब्द डांगी बोलीमध्ये एकवचनी आणि अनेकवचनी अशा दोन्ही पद्धतीने वापरला जातो. त्याचे मराठी भाषेप्रमाणे 'डोळा'(एकवचनी) आणि'डोळे'(अनेकवचनी) असेहोत नाही.

या डोळ्यांविषयी अजून एक उखाणा असा,

ती गय ती गय ती गय, ती आनी ती आनी ती आनी?

उत्तर: नजर

विश्लेषण:

ती गय ती गय ती गय: ती गेली ती गेली ती गेली

ती आनी ती आनी ती आनी: ती आली ती आली ती आली

आपली नजर इतकी चंचल असते की, ती केव्हा कुठे जाईल हे सांगता येत नाही. एका अर्थाने ती अतिवेगाने पळणारी एखादी शक्ती आहे असे वाटते. म्हणून ती गय ती गय, ती आनी ती आनी असे शब्द योजले आहेत.

वायबारीक वाटकीमा टिटूबाई नाचं?

उत्तर: जीब (जीभ)

विश्लेषण:

वायबारीक वाटकीमा टिटूबाई नाचं: लहान वाटीमध्ये टिटूबाई नाचे

आपल्या जबड्याला किंवा मुखविवराला लहान वाटीची उपमा देऊन त्यामध्ये टिटूबाईला नाचवले आहे. ही टिटूबाई म्हणजेच जीभ.

डोळे आणि जीभेप्रमाणेच नाकावर किंवा नाकातील शेंबूडावरही एक उखाणा सापडतो. तो असा,

आसटला डवर टाकला कुडावर?

उत्तर: सेंबडे (शेंबूड)

विश्लेषण:

आसटला डवर टाकला कुडावर: म्हाताऱ्याला हिसका देऊन भिंतीवर टाकणे

सर्दी झाली असता नाकातून पाणी यायला लागतं. त्यालाच आपण शेंबूड असेही म्हणतो. या शेंबडाला म्हाताऱ्याची उपमा देऊन हा उखाणा सिद्ध केला आहे. माणूस म्हातारा झाला की तो निष्क्रिय होतो अशावेळी त्याला घरातील एखादा कोपरा दाखवला जातो. त्याप्रमाणे नाकातील शेंबूडही काही कामाचे नसते. म्हणून त्यालाही नाकातून काढून एखाद्या कुडावर म्हणजेच भिंतीवर टाकले जाते.

म्हातारपणाशी निगडीत आणखी एक उखाणा पाहता येईल.

आंबाडीनी जुडी लयना का नीही त लय?

उत्तर: फुलेल डोकी (सफेद केस)

विश्लेषण:

आंबाडीनी जुडी लयना का नीही त लय: अंबाडीची जुडी आणली की नाही, तर आण.

अंबाडी ही एक पालेभाजी आहे. ती चवीला थोडीसी आंबट असते. देशी भेंडीसारखी थोडक्यात दिसायला असते. त्या दोघांमध्ये बरेच साम्य असते. परंतु भेंडीला जशी भेंडी येतात तशी अंबाडीला येत नाहीत. तिची फळे छोटी असतात आणि ती खात नाहीत. अंबाडीचे झाड वाळते की तिच्या सालीपासून एक धारा तयार केला जातो. हा तंतू धागा दिसायला म्हाताऱ्या स्त्रीच्या सफेद झालेल्या केसांसारखा दिसतो. म्हणूनच वरील उखाण्याचे उत्तर फुलेल डोकी म्हणजेच सफेद झालेले केस असे आहे.

व्यक्तीच्या मरणोत्तर त्याचे चांगले विचार समाजमनात टिकून राहतात असे म्हटले जाते. माणूस मरतो पण त्याचे विचार मरत नाहीत. असे आपण अनेक महात्म्यांच्या विचारांबद्दल बोलतो. याच विचाराला अनुसरून एक डांगी उखाणा सापडतो.

थरांबू पेटी ग्या, ईळा रही ग्या?

उत्तर: इचार (विचार)

विश्लेषण:

थरांबू पेटी ग्या: थरांबू पेटून गेला

ईळा रही ग्या: विळा राहून गेला

विळ्याची जी मुठ असते तिला थरांबू म्हणतात. ही मुठ लाकडाची अथवा बांबूची असू शकते. अशा थरांबू असलेल्या विळ्याला अग्नीमध्ये टाकले तर साहजिकच थरांबू लाकडाचे असल्याने ते जळून जाईल. परंतु विळा लोखंडाचा असल्याने जळणार नाही. त्याचप्रमाणे माणसाची कुडी अग्नीत टाकल्यास जळून जाईल. परंतु माणसाने त्याच्या उभ्या आयुष्यात जे चांगले विचार

समाजात पेरून ठेवलेले असतात ते कोणत्याही अग्नीने जळू शकणार नाहीत. यातून मानवी शरीर नश्वर असले तरी त्याचे विचार नश्वर नाहीत हा अनमोल विचार या उखाण्यातून समाजमनाला दिला जातो.

५. १६. ४. निसर्ग सृष्टीविषयक डांगी उखाणे:

डांगी आदिवासी निसर्ग सृष्टीबद्दल कसा विचार करतात? त्यांच्या दृष्टीने त्याचे काय आणि किती महत्त्व आहे? निसर्गाकडे त्यांचा बघण्याचा दृष्टीकोन कसा आहे? अशा अनेक प्रश्नांचा उहापोह आपल्याला त्यांच्यात प्रचलित असलेल्या काही उखाण्यांवरून करता येईल.

तेला येतावर पण गाळ अन् जातावर पण गाळ?

उत्तर: पाणी (पाऊस)

विश्लेषण:

तेला येतावर पण गाळ: त्याला आल्यावरही शिवी

अन् जातावर पण गाळ: आणि गेल्यावरही शिवी

एका अर्थाने पाऊस हा आदिवासींसाठी देवच आहे. त्यामुळेच तो अनेकदा पावसाची पूजा करताना दिसतो. त्याविषयी वेगवेगळे समज या आदिवासींमध्ये प्रचलित आहेत. सारांश पाऊस हा आदिवासींसाठी पूज्य असतो. असे असले तरी तो काहीवेळा पावसावर नाराज होतांनाही दिसतो. खास करून पेरणी आणि लावणीच्या वेळी असे नाराजीचे वातावरण दिसून येते. पेरणी आणि लावणीच्या वेळी पावसाची नितांत गरज असते. त्याचवेळी काही माणसांना अजिबात गरज नसते. आपल्या हाताची पाचही बोटे सारखी नसतात. त्याप्रमाणे या माणसांची पेरणी आणि लावणीची वेळ एकच नसते. अशा वेळी ज्याला गरज आहे तो शांत असतो मात्र ज्याला पावसाची अजिबात गरज नसते तो त्याला हमखास शिव्या देतो. किंवा वेळेवर पाऊस पडला नाही तरी त्याला शिव्या घातल्या जातात. हाच अनुभव त्यांनी या उखाण्यातून व्यक्त केला आहे. म्हणजे पाऊस आला तरी शिव्या, नाही आला तरी शिव्या.

इकून शिरं न तिकून निंगं?

उत्तर: सूर्य

विश्लेषण:

इकून शिरं न तिकून निंगं: इकडून शिरे तिकडून निंगे

सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो. ही सूर्याची दिनचर्या लक्षात घेऊन हा उखाणा तयार झाला आहे.

लाल गाय चरत जाय, धवळी गाय बिसत जाय?

उत्तर: आग अन् राखुंडी

विश्लेषण:

लाल गाय चरत जाय: वणव्यातील अग्नीला उद्देशून

धवळी गाय बिसत जाय: अग्नीत जळालेल्या लाकडांची रक्षा

हाच उखाणा मला डांगच्याच एका दुसऱ्या स्थानी सापडला. तो असा,

लाल गाय चरत जा न काळी गाय बिसत जा?

उत्तर: इंगळा (निखारा) अन् कोळसा

विश्लेषण:

लाल गाय चरत जा: वणव्यातील निखाऱ्याला उद्देशून

काळी गाय बिसत जा: अग्नीत जळालेल्या लाकडांचे कोळसे

जंगलात वणवा लागलेला ह्या लोकांनी पाहिला असावा. किंवा ते आदोर (राब) पेटविताना तो अनुभव आला असावा. वणव्याच्या वेळी अग्नी पुढे पेटत जाते आणि मागे जंगलाची राख होत जाते. हेच दृश्य या उखाण्यात टिपण्यात आले आहे. दुसऱ्या उखाण्यात वणव्यातील अग्नी बाजूला सारला गेला आहे. त्याठिकाणी निखाऱ्यांचा उल्लेख येतो. आणि धवळया गायीच्या म्हणजेच राखुंडीच्या ठिकाणी काळी गाय म्हणजेच कोळसे घेतले गेले आहेत.

आईस गडच गुंबाळी, लेकीस चोपडी, लेकुस फुसडीखोर?

उत्तर: महू/मोह आणि टोळंबी

विश्लेषण:

आईस गडच गुंबाळी: मोहाच्या झाडाला उद्देशून

लेकीस चोपडी: मोहाच्या फुलाला उद्देशून

लेकुस फुसडीखोर: मोहाच्या बीला (टोळंबी) उद्देशून

मोहाचे झाड दिसायला ओबडधोबड दिसते. त्याच्या खोडावर अनेक लहान मोठ्या गाठी पाहायला मिळतात. त्यामुळेच येथे त्याला ‘गडच गुंबाळी’ असा शब्द वापरला आहे. मोहाची फुले पांढरट – पिवळट रंगाची असतात. ती गोलाकार असून आतमध्ये पोकळी असते. वरून गुळगुळीत असल्याने येथे त्यांना ‘चोपडी’ हा शब्द वापरला आहे. तर मोहाची बी ही कठीण असते. त्यामुळेच येथे ‘फुसडीखोर’ असा शब्दप्रयोग केला आहे. या बियांपासून तेलही काढले जाते. या बीला टोळंबी असे म्हटले जाते.

मोठे आखडाला बामुण धोतीर नेसं?

उत्तर: कवदर

विश्लेषण:

मोठे आखडाला: मोठ्या कड्याला

बामुण धोतीर नेसं: ब्राह्मण धोतीर नेसतो.

डांगी आदिवासींचा कड्या-कपारींशी चांगला परिचय आहे, हे या उखाण्यावरून दिसून येते. कवदर म्हणजे केळीसारखे दिसणारे एक झाड. हे झाड रानात उगवत असल्याने आपण त्याला रानकेळ असं म्हणू शकतो. अगदी केळीसारखेच हे झाड असते. तरीही त्याला सामान्य केळीसारखी मोठी फळे येत नाहीत. ती फळे लहान असून बेचव असतात. शिवाय ते एखाद्या डोंगराच्या अतितीव्र उताराच्या खडकाला उगवलेले असते. त्यामुळेच 'मोठे आखडाला' असा शब्द आलेला आहे.

कोंबडा आरडं, माणूस उठं?

उत्तर: पहाट

ग्रामीण भागातील लोकांकडे सहसा घड्याळं पाहायला मिळत नाहीत. त्यांची दिनचर्या सूर्याच्या मार्गक्रमणावर अवलंबून राहते. सूर्याच्या स्थिती गतीवरून ते अचून वेळ दर्शवू शकतात. असे असले तरी रात्रीचे काय? असा प्रश्न पुन्हा पडतोच. तर रात्रीची वेळ त्यांना कोंबडा सांगतो. कोंबडा काही ठराविक वेळीच ओरडतो. म्हणजेच बांग देतो. तसेच पहाट झाली की तो ओरडतो. याच स्थितीला उद्देशून वरील उखाणा तयार झाला आहे.

५. १६. ५. घरोपयोगी वस्तूंविषयक डांगी उखाणे:

घरात लागणाऱ्या विविध वस्तूंविषयी डांगी उखाणे बरेच सापडतात. ह्या वस्तू माणसाच्या नित्य परिचयाच्या असतात. त्यांचा वापर दैनंदिन जीवनात केला जातो. त्यामुळेच त्या उखाण्याच्या रूपाने आपल्या समोर येतात.

मागं मागं सरं अन् आखा घर भरं?

उत्तर: शेण

ग्रामीण भागात अजूनही आपले घर शेणानेच सारवले जाते. घर सारवतांना घरातील स्त्री मागे मागे सरकत जाते. त्याचवेळी तिच्या समोरची जागा शेणाने सारवली जाते म्हणजेच शेणाने भरत जाते. हीच प्रक्रिया वरील उखाण्यात ध्यानात घेतली गेली आहे.

सात जना एक उसा?

उत्तर: घर

विश्लेषण:

सात जना: सात व्यक्ती

एक उसा: एक उशी

घराचे खांब किंवा वासे अनेक असले तरी त्याच्यावर छप्पर मात्र एकच असते. हेच वैशिष्ट्ये प्रस्तुत उखाण्यातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यावरून व्यक्ती अनेक असले तरी उशी एकच आहे हे सिद्ध होते.

भूजेल कोंबडी झाडवर चहडं?

उत्तर: कुराड (कुऱ्हाड)

विश्लेषण:

भूजेल कोंबडी: भाजलेली कोंबडी

झाडवर चहडं: झाडावर चढे

आता भाजलेली कोंबडी कधी झाडावर चढणार आहे का? तर नाही. कारण कोंबडी जिवंतच नाही तर ती चढणार तरी कशी. येथे अतिशयोक्तीचा भाग जरावेळ बाजूला ठेवून फक्त निर्जीव वस्तू त्याची त्याची झाडावर कशी चढते हे लक्षात घ्यावे. उन्हाळ्यात डांगी लोकं आदरासाठी जंगलातील काही झाडांची छाटणी (खांडणी) करतात. त्यावेळी ते कुऱ्हाडीला आपल्या खांद्यावर मागच्या बाजूने टांगतात. आणि झाडावर चढतात. अशावेळी ते कुऱ्हाडीला हात लावत नाहीत. म्हणजेच ती कुऱ्हाड आपोआपच वर चढते अशी कल्पना करून कुऱ्हाडीविषयी हा उखाणा तयार केला आहे. म्हणजेच भाजलेली कोंबडी झाडावर चढते.

बारा डाकू, तीन चाकू?

उत्तर: घड्याळ

बारा डाकू म्हणजेच घड्याळातील एक ते बारा आकडे. आणि तीन चाकू म्हणजेच घड्याळात फिरणारे तीन काटे.

धवळी भूय, काळा बी, डोळेनी पाहायचा, तोंडानी इचायचा?

उत्तर: पुस्तक

विश्लेषण:

धवळी भूय: सफेद जमीन

काळा बी: काळे बी

डोळेनी पाहायचा: डोळ्याने बघायचे

तोंडानी इचायचा: तोंडाने वेचायचे

धवळी भूय म्हणजेच पुस्तकाची सफेद पृष्ठे. काळा बी म्हणजेच पुस्तकामध्ये छापलेली काळ्या रंगाची अक्षरे. ही अक्षरे डोळ्याने बघून तोंडाने वाचायची. या उखाण्यावरून डांगी अशिक्षित समजली जाणारी माणसंही आता पुस्तकांविषयी सकारात्मक विचार करायला लागली आहेत असे म्हणता येते.

रातने नेसं न दिसने सोडी टाकं?

उत्तर: दार (दरवाजा)

विश्लेषण:

रातने नेसं: रात्री नेसते

दिसने सोडी टाकं: दिवसा सोडून टाकते

घराचे दार दिवसभर उघडे असते या क्रियेला दिवसा सोडून टाकते असे संबोधले आहे. तर घराचे दार रात्रीच्या वेळी बंद असते या क्रियेला नेसते असे संबोधले आहे.

डवर बुडं अन् तेनी सालू नी बुडं?

उत्तर: साबू (साबण) अन् फेस

विश्लेषण:

डवर बुडं: म्हातारा बुडतो

अन् तेनी सालू नी बुडं: आणि त्याची शालू नाही बुडत

कपडे धुतांना पाण्यामध्ये साबण पडल्यास तो बुडतो परंतु त्याच साबणाचे फेस पाण्यात बुडत नाही. हेच सांगण्याचा प्रयत्न या उखाण्याच्या माध्यमातून केला आहे.

सकाळना उठं सिडकं हात?

उत्तर: कपडाना बाहटा (कपड्याच्या बाह्या)

विश्लेषण:

सकाळना उठं: सकाळी उठून

सिडकं हात: झटके हात

जवळजवळ सगळ्याच माणसांना सवय असते की, सकाळी उठून कपडे घालण्याआधी ते झटकून घेतो आणि मग घालतो. यावेळी कपड्यांच्या बाह्या झटकल्या जातात.

बुटे पाणी न वर झाड?

उत्तर: चिमणी

पूर्वी वीज (लाईट) नसल्याने रॉकेलच्या चिमणीचा वापर केला जायचा. ग्रामीण भागात तर अजूनही रॉकेलच्या चिमणीचा वापर केला जातो. प्रत्येक गावात आज विजेचे खांब उभे असलेले दिसत असले तरी त्या खांबांना चोवीस तास वीज असेलच असे नाही. भार नियमनाची (लोड शेडींग) समस्या अजूनही ग्रामीण भागात खूप आहे. त्यामुळे चिमणीसारखी वस्तू अजूनही टिकून आहे. चिमणी टिकून आहे म्हणूनच त्यावरील उखाणाही टिकून आहे. बुटे पाणी म्हणजे खाली पाणी. पाणी असे

रॉकेलला म्हटले आहे. वरती झाड म्हणजेच रॉकेलच्या वरती जी चिमणीची ज्योत असते ती. वरती ज्योत आणि खाली रॉकेल असा त्याचा अर्थ होतो.

ही चिमणी पेटविण्यासाठी जी माचीस लागते तिच्यावरही एक डांगी उखाणा सापडतो. तो असा,

एक घरमां पका चोर, चोरसा दोन काज,

तेसनी सेम्टी धरी न आसटी निर्ताज हुई जा उजेड?

उत्तर: दिवासळी (माचीस)

विश्लेषण:

एक घरमां पका चोर: एका घरामध्ये खूप चोर

चोरसा दोन काज: चोरांची दोन कामं

तेसनी सेम्टी धरी न आसटी: त्यांची शेपूट धरून ओढली

निर्ताज हुई जा उजेड: लगेच होऊन जाते उजेड

एका माचीसमध्ये खूप काड्या असतात त्यालाच उद्देशून खूप चोर असे म्हटले आहे. यातली एकही काडी घेऊन ती माचीसच्या सहाय्याने पेटवली की घरभर उजेड होते. अंधाऱ्या खोलीमध्ये क्षणात उजेड करणाऱ्या या माचीसची किमया या उखाण्यातून सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

५. १६. ६. आहारविषयक डांगी उखाणे:

डांगच्या आदिवासींचे आहारविषयक उखाणे हे मीठ आणि भाकरीशी निगडीत आहेत. ते थोडक्यात असे,

आईस माणसासा हिसाब करह?

उत्तर: भाकरी बनवह

विश्लेषण:

आईस माणसासा हिसाब करह: आई माणसांचा हिशोब करते

साधारणतः ग्रामीण भागातील किंवा इतर कोणत्याही ठिकाणी कोणतीही स्त्री भाकरी बनवताना घरातील व्यक्तींची संख्या मोजूनच भाकरी बनवते. म्हणून वरील उखाण्यात म्हटले आहे, आई माणसांचा हिशोब करते.

उलूशी गडू, तूबी रडू मीबी रडू?

उत्तर: कांदा

विश्लेषण:

उलूशी गडू: लहानशी वस्तू

तूबी रडू मीबी रडू: तुही रडशील मीही रडेल

कांदा हा सर्वांना परिचित असा आहे. तो दिसायला लहान असला तरी त्याने आतापर्यंत कोणाला रडवले नाही असे उदाहरण क्वचितच सापडेल.

हर हर हरणे, आईस गेली मरणे, लेकीस आनी परणे?

उत्तर: मिरची

मिरचीचे झाड वाळून गेले तरी त्या झाडाला लागलेल्या आणि आता वाळून गेलेल्या, लाल झालेल्या मिरच्या आपण उपयोगात आणतो. म्हणजेच त्या वाळलेल्या मिरच्यांना जन्म देणारी आई आता मेलेली आहे, वाळलेली आहे. म्हणून येथे म्हटले आहे. आईस गेली मरणे. आणि लेकीस आनी परणे. अशा पद्धतीने आपल्याला आहार या विषयाशी निगडीत अनेक डांगी उखाणे पाहता येतात.

५. १६. ७. अश्लील प्रकारातले डांगी उखाणे:

डांगी उखाण्यांतून ग्राम्य शब्दयोजना किंवा अश्लील शब्दयोजना केलेली दिसून येते. उखाण्याचे रूप जरी अश्लील वाटत असले तरी त्याचे उत्तर अश्लील नसते. तर काहीवेळा उखाण्याचे रूप सामान्य वाटते आणि त्याचे उत्तर अश्लील असते.

कडीवर डेंगणा?

उत्तर: मकय (मका)

मक्याचे पिक बघितले की ह्या उखाण्याचे उत्तर योग्य वाटते. साधारणतः कोणत्याही शेतीचे पिक हे शेंड्याला अथवा मातीच्या खाली येते. मात्र मका एकमात्र असे पिक आहे की, त्याचे कणीस त्याच्या कंबरेच्या भागामध्ये असते. 'कडीवर' या शब्दातून कंबरेवर असा अर्थ सूचित होतो. एखाद्या लहान मुलाला आपण कडेवर उचलून घेतो त्याप्रमाणे हे कणीस कडेवर असते. परंतु येथे कणीसाला डेंगणा (पुरुषाचे लिंग) असे म्हटले आहे. शिवाय पुरुषाचे लिंगही मक्याप्रमाणे कडेवर असल्याची कल्पना यातून केलेली दिसून येते.

चार जन टिंगना, तेहने गांडमा दोन दोन डेंगणा?

उत्तर: खाटला (खाट)

विश्लेषण:

चार जन टिंगना: खाटेच्या चार पायांना उद्देशून

तेहने गांडमा दोन दोन डेंगणा: त्यांच्या गांडीत दोन दोन लिंग

सध्या अनेक प्रकारचे खाट बाजारात उपलब्ध आहेत. बहुतेक या आधुनिक खाटांना हा उखाणा लागू पडणार नाही. परंतु ग्रामीण भागात आजही लाडकी खाटांचा उपयोग केला जातो. हे

लाकडी खाट चार पायांवर उभे राहात असून त्यामध्ये चार आडव्या दांड्या अडकवलेल्या असतात. म्हणूनच येथे चार पायांचा आणि चार (दोन+दोन =चार) आडव्या दांड्यांचा उल्लेख केला आहे. या आडव्या दांड्यांनाच डेंगणा (पुरुषाचे लिंग) असे संबोधण्यात आले आहे.

५. १६. ८. इतर प्रकारचे डांगी उखाणे:

असे काही उखाणे आहेत की, त्यांचे वर्गीकरण करणे खूप कठीण काम आहे असे जाणवते. तर काहीवेळा त्यांचे वर्गीकरण करता येणे शक्यही आहे. परंतु त्याच पठडीतले दुसरे उखाणे सापडत नाहीत. त्यामुळे एकाच उखाण्याचे वर्गीकरण करणे योग्य नाही असे मला वाटते. अशाच काही उखाण्यांचा इतर प्रकारामध्ये समावेश केला आहे.

बांडी लांडी दमकोंडी न देम्टी मुतवली?

उत्तर: दारुनी भट्टी (दारूभट्टी)

ग्रामीण भागात गावठी दारूभट्टी कशी असते ते या उखाण्यावरून सांगता येईल. दारू गाळतांना किंवा तयार करतांना एक साधारणतः पंधरा किलोचा तेलाचा रिकामा डब्बा (जो पत्र्याचा असतो तो) घेतला जातो. त्यात चार पाच दिवस अगोदरच मोहाची फुले, गुळ, पाणी आणि सागऱ्या (एक पांढरा कठीण पदार्थ) यांचे मिश्रण करून आंबवले जाते. ज्यात हे मिश्रण असते तो डब्बा चुलीवर ठेवला जातो. त्याच्यावर लाकडापासून तयार केलेला एक ठोकळा ठेवला जातो. हा ठोकळा किक्र्याच्या सहाय्याने थोडासा कोरून पोकळ केलेला असतो. आणि त्याच्यावर एक मोठे पातेले थंड पाण्याने भरून ठेवले जाते. आता डब्बा, लाकडी ठोकळा आणि वरचे पातेले यांच्यामध्ये असलेली जागा किंवा फट चिखलाने माखलेल्या चिंध्यांनी लिंपली जाते. हे लिंपण्याचे कारण असे की, खालच्या डब्ब्यातून येणारी गरम वाफ बाहेर जाऊ नये. ही गरम वाफ वरच्या थंड पाण्याने भरलेल्या पातेल्याला लागताच पाण्यात रुपांतर होते. आता हे पाणी त्या लाकडी ठोकळ्याला लावलेल्या लोखंडी नळीतून बाहेर काढले जाते. ते पाणी म्हणजेच दारू. दारूभट्टीचे हे विश्लेषण अगदी थोडक्यात उखाण्याचा सार समजावा म्हणून केले आहे. मुळात ही प्रक्रिया खूप मोठी आहे. बांडी लांडी दमकोंडी म्हणजेच ही दारूभट्टी चारी बाजूने घट्ट बांधून घेऊन तिच्यातील वाफेची दमकोंडी केली जाते. आणि सेम्टी मुतवली म्हणजेच लाकडी ठोकळ्याला लावलेल्या नळीतून दारूची झोत पडते ते.

दारूभट्टीशीच संबंधित अजून एक उखाणा डांगमध्ये सापडतो तो असा,

बांदी रुंदी ठठ करं, सेम्टी वाटून दम टाकं?

उत्तर: दारूनी भट्टी (दारूभट्टी)

वरील उखाण्याप्रमाणेच हाही उखाणा आहे. याचेही वरील उखाण्याप्रमाणे विश्लेषण करता येईल. हा उखाणा सांगण्याची ढब थोडी वेगळी असली तरी त्याच्यातून निघणारा अर्थ सारखाच आहे.

पायधर लुगडा, पोटमां दगडा, डोकीवर सगडा?

उत्तर: चिलीम

विश्लेषण:

पायधर लुगडा: पायापर्यंत लुगडं

पोटमां दगडा: पोटामध्ये दगडं

डोकीवर सगडा: माथ्यावर शेगडी

चिलीम ही पूर्ण पोकळ असते. तिच्या आतमध्ये तंबाखू भरली जाते. आणि मग तिच्या पुढील टोकाला आग लावली जाते. या उखाण्यात चिलीमच्या बाह्य भागाला पायधर लुगडं म्हटले आहे. तर पोटमां दगडा म्हणजेच चिलीमच्या पोटामध्ये जी तंबाखू असते ती. आणि डोकीवर सगडा म्हणजेच चिलीमच्या पुढील टोकाला जी आग लावली जाते ती.

असरली गोदडी पसरले पाय, पायती बसं तेना नाव काय?

उत्तर: वाना (मासे पकडण्याचे एक साधन)

विश्लेषण:

असरली गोदडी पसरले पाय: अंथरली गोधडी पसरले पाय

पायती बसं तेना नाव काय: पायथ्याला बसलेल्याचे नाव काय

डांग प्रदेशात माशांची शिकार करण्यासाठी वानाचा उपयोग केला जातो. ह्या वानालाच खडान किंवा चढान असेही म्हणतात. पावसाळ्याच्या उत्तरार्धात नदीच्या पात्राचे पाणी अडवून एक चटईसारखी बांबूची ताटकी अंथरली जाते. यालाच असरली गोदडी पसरले पाय असे म्हटले आहे. या बांबूच्या चटईखाली एक भोत मांडला जातो. त्यामध्ये नदीतील मासे, झिंगे आणि खेकडे येऊन पडतात. अशा पद्धतीने त्यांची शिकार केली जाते. यालाच वाना असे म्हटले जाते.

मरेल डोसी धाप टाकं?

उत्तर: धामून (पंचाळाजवळचे हवा घालण्याचे यंत्र)

मरेल डोसी धाप टाकं म्हणजेच निर्जीव वस्तू श्वास सोडते असा त्याचा अर्थ आहे.

वरील उखाण्यांचे विश्लेषण करतांना मी सोप्या भाषेत विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. काही उखाण्यांतील डांगी शब्द समजायला कठीण आहेत. अशा ठिकाणी मी मराठी प्रमाण भाषेतील शब्दाची योजना केलेली आहे. तर काही ठिकाणी डांगी शब्द मराठीशी मिळतेजुळते आहेत. अशा ठिकाणी मात्र मी अधिक विश्लेषण केले नाही. पुढे यातून निघणाऱ्या विविध वैशिष्ट्यांची, लक्षणांची चर्चा करणार आहोत.

५. १७. उत्तरातील विषमता:

उत्तरातील विषमता तपासतांना मला असे जाणवले की, उखाणा एकच आणि सारखाच आहे. परंतु त्याचे उत्तर मात्र दोन ठिकाणी वेगवेगळे आहे. उदाहरणार्थ: **१. हात नाय पाय, लोल्या बजारं जाय? २. हात नीही पाय, लुले बजारं जाय?** हे दोन वेगवेगळ्या ठिकाणी मिळालेले उखाणे घेऊ. यांचे उत्तर अनुक्रमे ‘आंडू’ (अंडे) आणि ‘पैसा’ असे मिळाले आहे.

याठिकाणी अंडे आणि पैसा यांची तुलना करता दोघांनाही हात किंवा पाय नाहीत. दोघेही बाजारात जातात. लुळे पांगळे असतांनाही आपापले व्यवहार साध्य करतात. एखादी नोट फाटलेली, तुटलेली किंवा खराब झालेली असेल तर दुकानदार सांगतो की, 'ही नोट चालणार नाही.' म्हणजे ती नोट खरोखरच जमिनीवर चालणार नाही असे होत नाही. तर ती नोट चलनात चालणार नाही असा त्याचा अर्थ होतो. सांगण्याचा हेतू हा की, पैसे हे निर्जीव आहेत. याउलट हात पाय नसलेले अंडे जरी असले तरी भविष्यात कोंबडीच्या उबेमुळे त्याला हात पाय फुटू शकतात. ते खरोखर चालू शकते. म्हणजे ते सजीव आहे. ही विषमता लक्षात घेता असे दिसून येते की, हात पाय नसल्याची कल्पना फक्त अंड्याच्या बाबतीत करता येऊ शकते, पैशाच्या नाही. त्यामुळे वरील उखाण्याचे मूळ उत्तर अंडे असावे.

५. १८. अतिउच्च निरीक्षण शक्ती:

मी येथे एका उखाण्याच्या आधारे डांगी आदिवासींची निरीक्षण शक्ती किती प्रबळ आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. 'आठ अठींगडा, बारा फटींगडा, चार चऊकडा, दोन आकडा?' हा उखाणा घेऊ. याचे मला मिळालेले उत्तर 'अनुक्रमे कुत्री, वाघीण, गाय आणि बकरी यांच्या स्तनांची संख्या' असे आहे.

मात्र डांगी लोकसाहित्याचे गुजराती अभ्यासक प्रा. डॉ. पुंडलिक पवार यांच्या 'डांगी लोकसाहित्यविमर्श' या पुस्तकात अगदी हाच उखाणा सापडला. 'आठ अटांगन, बारा पटांगन, चार चवकडा, दोन आकडा, ती काय?' असा तो उखाणा आहे. येथे अठींगडा, फटींगडा, चऊकडा या तीन शब्दांचे अनुक्रमे अटांगन, पटांगन, चवकडा असा थोडासा शब्दबदल झालेला दिसतो. हा बदल 'दर बारा कोसावर भाषा बदलते' याचा किंवा गुजराती भाषेचा परिमाण समजावा. बाकी उखाणा तोच आहे. मात्र या उखाण्याचे उत्तर काहीसे वेगळे आहे. त्यांनी कुत्री, गाय आणि बकरी यांच्या स्तनांची सख्या बरोबर दिली आहे, परंतु वाघिणीच्या स्तनांची संख्या न देता 'वाघनां शरीर पर बार रंगना पट्टा'[२४] असे गुजरातीमध्ये म्हटले आहे. म्हणजेच वाघाच्या शरीरावरील बारा रंगाचे पट्टे असे उत्तर देतात. वरवर पाहता हे उत्तर ठीक वाटत असले तरी खरे उत्तर ते नाही असे म्हणावे वाटते. कारण वाघाच्या शरीरावर बाराच पट्टे असतील असे नाही. त्यांची संख्या वाघाच्या शरीर विकासावर अवलंबून असते. एखाद्या वाघाचे शरीर मोठे किंवा लांब असेल तर त्याच्या शरीरावर हे पट्टे बाराहून अधिक असू शकतात. आणि लहान वाघ असेल तर त्याच्या शरीरावर कमीही पट्टे असू शकतात. शिवाय वाघाच्या खूप जाती आहेत. त्यापैकी बहुतेक जातीच्या वाघांच्या पाठीवर पट्टे नसून वेगवेगळया रंगाचे ठिपके असतात. याउलट वाघीण लहान असेल किंवा मोठी शिवाय ती कोणत्याही जातीतील असली तरी तिच्या स्तनांची संख्या सारखीच असते हे लक्षात घ्यावे.

अजून एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की या उखाण्यात कुत्री, गाय आणि बकरी यांच्या स्तनांची संख्या उत्तर म्हणून दिली आहे. अशावेळी फक्त वाघाच्या शरीरावरील पट्ट्यांची संख्या देणे संभवत नाही. अजून एक असे की, कुत्री, गाय आणि बकरी ह्या माद्या आहेत. वाघ हा नर आहे. त्यामुळे माद्यांच्या रांगेत नराला आणून बसवणे शक्य वाटत नाही. उखाण्याच्या वैशिष्ट्यात हे बसत नाही. त्यामुळे वाघिणीच्या स्तनांची संख्या हेच उत्तर बरोबर आहे.

वाघिणीचे नुसते दर्शनही झाले तरी माणसाला सळो की पळो असे होऊन जाते. तर तिच्या स्तनांची संख्या मोजत बसणे म्हणजे मृत्यूला साक्षात निमंत्रण देण्यासारखेच आहे. याच कारणास्तव इंटरनेटसारख्या महाजालावरही 'वाघिणीच्या स्तनांची संख्या किती?' या प्रश्नाचे उत्तर सापडत नाही. यावरून जग कितीही पुढे गेले, स्वतःला पुढारलेले समजत असले, अत्याधुनिक यंत्रांचा चतुराईने वापर करत असले तरी त्यापासून अशा काही गोष्टी जगाच्या उदरात लपून बसलेल्या आहेत त्यांचा अजूनही शोध घ्यायचा बाकी आहे. अशापैकीच एक गोष्ट म्हणजे वाघिणीच्या स्तनांची संख्या किती? याचे उत्तर मिळवण्यासाठी मोठ मोठ्या यंत्रांची गरज नाही. फक्त गरज आहे ती आदिवासींच्या लोकसाहित्याला आकलन करून घेण्याची. त्यांच्या निरीक्षण शक्तीच्या माध्यमातून आपल्याला काही गोष्टींचे आकलन करून घेता येऊ शकते.

५. १९. अश्लील शब्दयोजना:

डांगी उखाण्यांमधून अश्लील शब्दयोजना केलेली आपल्याला पाहायला मिळते. जसे गांड, डेंगणा, थाना असे अनेक शब्द पाहायला मिळतात. या उखाण्यांची उत्तरे मात्र अश्लील नसतात. त्यामुळे हे उखाणे स्त्री, पुरुषांमध्ये सहज उच्चारले जातात. यावेळी मनामध्ये कोणत्याही प्रकारचा संकोच ठेवला जात नाही.

५. २० . उखाण्यात आढळून येणारा बदल:

काही उखाणे एकाच अनुभवातून निर्माण झालेले आहेत असे वाटते. तरीही त्यांच्या अनुभवाच्या कडा कशा वेगळ्या आहेत ते पाहता येते. उदा. **१. लाल गाय चरत जाय, धवळी गाय बसत जाय? २. लाल गाय चरत जा न काळी गाय बिसत जा?** असे दोन उखाणे पाहता येतील. त्यांची उत्तरे अनुक्रमे 'अग्नी - रक्षा' आणि 'निखारा - कोळसा' अशी आहेत. या उखाण्यात अनुभव एकसारखाच आगे. तो म्हणजे वणव्याचा. पहिल्या आणि दुसऱ्या उखाण्यात लाल गायीचा उल्लेख येतो. परंतु त्यांची उत्तरे वेगवेगळी आहेत. पहिल्याचे उत्तर अग्नी तर दुसऱ्याचे उत्तर निखारा असे आहे. दोघेही लाल असतात असे गृहीत धरू. परंतु एकातून अग्नीच्या ज्वाळांचे प्रतिक समोर येते तर दुसऱ्यातून निखाऱ्याचे. शेवटच्या कडव्यांमध्ये मात्र पहिल्या याच्यात धवळी तर दुसऱ्यामध्ये काळी गाय सांगितली आहे. याचेही उत्तर वेगवेगळे आहे. धवळी गाय म्हणजे रक्षा तर काळी गाय म्हणजे कोळसा. उत्तरे दोघांनाही जुळणारे आहेत.

येथे फक्त एवढेच म्हणायचे आहे की, एकाच अनुभवातून निर्माण होणारे दोन उखाणे दोन भिन्न ठिकाणी सापडतात. परंतु कधीकाळी हा उखाणा एकच असावा. आणि कालांतराने त्यात बदल झाला असावा. येथे कोणत्या उखाण्यात बदल झाला आहे हे सांगणे मात्र कठीण आहे. हा उखाण्यात होणारा बदल नोंद घेण्यासारखा आहे.

५. २१. उखाणे अनेक उत्तर एक:

एकाच वस्तूवर अनेक उखाणे पाहायला मिळतात. उदा. **१. हरण पोळं, दूद गळं?** (हरीण पळे, दूध गळे) **२. काळा केकड, धवळा वकीर?** (काळा खेकडा, पांढरा उकीर) या उखाण्यांचे उत्तर घरटी (जातं) असे आहे. पहिल्या उखाण्यात फिरणाऱ्या जात्याला पळणाऱ्या हरणाचे रूप देऊन

पडणाऱ्या पीठाला गळणाऱ्या दुधाचे रूप दिले आहे. तर दुसऱ्या उखाण्यात काळ्या जात्याला काळ्या खेकडाचे रूप देऊन पांढऱ्या पीठाला पांढऱ्या उकीराचे रूप दिले आहे.

यात्व्यतिरिक्त अजून काही उदाहरणे पाहता येतील. **१. राजाचे पोटात राणी, राणीचे पोटात पाणी? २. उचे उचे झाडवर झिरा? ३. आबडामां डबडा, डबडामां पाणी?** या उखाण्यांचे उत्तर नारळ असे आहे. झाडावर झिरा म्हणजे झाडावर पाणी असलेले नारळ हे एकमात्र फळ आहे. हे सगळे उखाणे नारळाच्या पोटातील पाण्याला उद्देशून म्हटले गेले आहेत. यावरून उखाणे अनेक असले तरी त्यांचे उत्तर एक असते असेही दिसून आले आहे.

५.२२. उखाण्यातील साम्यता:

काही उखाणे एकसारखेच असतात. परंतु त्यांची उत्तरे वेगवेगळी असतात. त्यांच्या म्हणण्याची लकब, चढ, उतार सारखीच असते. त्याचे एक महत्त्वाचे उत्तर म्हणजे उखाण्यातील साम्यता.

उदा. १. मोठे आखडाला बामूण धोतीर नेसं? - उत्तर: कवदर (रानकेळ)

२. मोठे आखडाला ढोंगी डोसी चढं? - उत्तर: कोकली (लहान झिंगा)

३. मोठे आखडाला चुंबळो राजा चढं? - उत्तर: खटखुबा (गोगलगाय)

४. मोठे माळमां उबडा गुंडा? - उत्तर: राजकुवर (मशरूम)

५. मोठे माळमां एक धारणे घर? - उत्तर: राजकुवर (मशरूम)

'मोठे आखडाला', 'मोठे माळमां', 'चढं' असे शब्द वारंवार आल्याने उखाणा एकसारखा असल्याचा भास होतो. हे उखाणे उच्चारण्याची पद्धतही एकसारखीच असते. त्यामुळे तर त्याच्यातली साम्यता अधिकच जाणवते.

वाक्प्रचार

५. २३. वाक्प्रचार म्हणजे काय?:

एखादा शब्द किंवा शब्दसमूह जेव्हा मूळ अर्थ म्हणजेच वाच्यार्थ सोडून दुसराच एखादा अर्थ प्रकट करत असतो, सुचवत असतो तेव्हा त्या विशिष्ट शब्दाला किंवा शब्दसमूहाला वाक्प्रचार असे म्हणतात. यालाच काही अभ्यासक 'वाक्संप्रदाय' असेही म्हणतात. मराठी भाषा जशी वाकवली तशी वाकते असे म्हणतात, ते या वाक्प्रचारामुळेच. विषयाच्या संदर्भानुसार वाक्यातील शब्द किंवा शब्दसमूह अनेक अर्थ सुचवत असतात.

उदा. 'पाणी' हा शब्द घेऊ.

१. घरी पाहुणे आले असता, 'पाहुणे कुठून आले? **पाणी** घ्या.'

२. थोड्याच वेळाने त्याच पाहुण्यांना, 'पाहुणे चहा-**पाणी** घेणार का?'

३. भांडण झाली असता, ‘थांब तुला **पाणी**च पाजतो!’

४. तिच्या डोळयातील **पाणी** पाहून माझेही डोळे भरून आले!

५. पावसाचे **पाणी** काही केल्या थांबत नाही.

६. आज नदीला भयंकर **पाणी** आहे.

७. रस्ते इतके चांगले की, वाहन चालवताना पोटातले **पाणी**सुद्धा हलत नाही.

८. ती चिंच खात असताना माझ्याही तोंडाला **पाणी** आले.

९. कोळी लोकं प्रामुख्याने खाऱ्या **पाण्या**तील मासे पकडतात.

१०. माझा सगळा पैसा **पाण्या**त गेला.

वरील प्रत्येक वाक्यातील ‘पाणी’ या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. त्यातील पहिल्या वाक्यातील पाणी हा शब्द नेहमीच्या पाण्याला उद्देशून वापरलेला आहे. मात्र नंतरच्या पत्येक वाक्यातील अर्थ वेगळा आहे. जसे, दुसऱ्या वाक्यातील पाणी या शब्दाला काहीही अर्थ नाही. ‘काम-बीम करा.’ या वाक्यातील ‘बीम’ या शब्दाला जसा काहीही अर्थ नाही तसा. तिसऱ्या वाक्यात बदला घेण्याच्या उद्देशाने पाणी हा शब्द वापरलेला आहे. चौथ्या वाक्यातील पाण्याचा अर्थ अश्रू असा होतो. पाचव्या वाक्यातून पावसाचे पाणी असा अर्थ निघतो. सहाव्या वाक्यामध्ये नदीला पूर आल्याचे दर्शवितो. सातव्यामध्ये शरीराची हालचाल होत नाही असा अर्थ निघतो. आठव्यामध्ये तोंडातील लाळ, नवव्यामध्ये समुद्र तर दहाव्यामध्ये निष्फळ गेलेली मेहनत या अर्थी पाणी हा शब्द वापरलेला आहे. यावरून वाक्प्रचार म्हणजे नेमके काय हे लक्षात घेता येते. असेच वाक्प्रचार डांगी बोलीतही सापडतात.

५. २४. डांग जिल्ह्यातील वाक्प्रचार:

डांगमध्ये मानवाच्या स्वभावानुसार अनेक प्रकारचे वाक्प्रचार ऐकायला मिळतात.

५. २४. १. शरीरावयवावर आधारलेले डांगी वाक्प्रचार:

१. डोळा उडहं- डोळे उडणे

- शकून किंवा अपशकून घडण्याचे संकेत.

२. डोळामां पाणी आना- डोळयात पाणी आले

- डोळयात अश्रू येणे

३. तुने पोटमां काय दुखहं?- तुझ्या पोटात काय दुखते?

- मी काहीही करेल तुझ्या पोटात काय दुखते? ह्या अर्थाने.

४. आमी काचे कानना- आम्ही कच्च्या कानाचे

- दुसऱ्याच्या बोलण्यावर सहज विश्वास ठेवणारे कान.

५. डोळा उडवात- डोळे उडवले

- डोळ्याने खुणावले/डोळ्याने इशारा करणे

५. २४. २. मानवी स्वभावावर आधारलेले डांगी वाक्प्रचार:

१. बिचारा पका गरीब (झोडीज टाकेल)- बिचारा खूप गरीब (झोडून टाकल्यासारखा)

- स्वभावाने शांत असलेला

२. डोळगायताहा/ डोळायनाहा/डोळा भरायनात- डोळ्यात येणे

- द्वेष करणे, वाईट नजर टाकणे

३. कान भरवाहात- कान भरवणे

- चुगली करणे, चहाडी करणे

४. गोठ टाकी देव जीसी नीही- गोष्ट टाकून देण्यासारखी नाही

- चहाडी केलेल्या गोष्टीतही ताकद असणे, ती गोष्ट मनाला भावणे

५. मनमा गोठ येवला लागनी- मनात गोष्ट भरायला लागली

- मनात येणाऱ्या गोष्टीचे महत्त्व पटणे

६. झाकेल गोठ- झाकलेली गोष्ट

- गुपित गोष्ट

५. २४. ३. निसर्गाशी निगडीत डांगी वाक्प्रचार:

१. आंदळाला चांद दाखवह- आंधळ्याला चांद दाखवणे

- अतिशयोक्तीने एखादी गोष्ट सांगणे

२. रायना डोंगर बनवह – राईचा पर्वत करणे

- अतिशयोक्तीने एखादी गोष्ट सांगणे

३. नय आनी- नदी येणे

- नदीला पूर येणे

४. नय गय- नदी गेली

- नदीला पूर गेला

५. दिस वर आना- दिवस (सूर्य) वर आला आहे

- दुपार झाली आहे.

६. दिवस वर चहडूला लागना- दिवस वर चढायला लागला

- दुपार व्हायला लागली.

५. २४. ४. श्रद्धा-अंधश्रद्धेवर आधारलेले डांगी वाक्प्रचार:

१. पोटाळी बायको खावला हेरहं- गर्भवती स्त्री खायला पाहते

- गर्भवती स्त्रीने एखादा पदार्थ खाण्याची इच्छा व्यक्त केली तर तिला तो पदार्थ कोणत्याही परिस्थितीत खायला आणून द्यावा. तसे न झाल्यास तिचा गर्भपात होतो अशी मान्यता आहे.

२. भगवानला हात जोडं- ईश्वराला हात जोडणे

- प्रार्थना करणे, भक्ती करणे

३. भगता हेरात- भगत पाहिले

- भगताकडून रोग निदान करून घेणे

४. दाना हेरात- दाने पाहिले

- भगताकडून रोग निदान करून घेणे

५. खाई पाडा- खाऊन पाडलं

- चटकीनीचा प्रभाव, दुष्ट शक्तीचा प्रभाव

६. देवमां/मंदिरमां जाहा – देवात/मंदिरात जातो

- ईश्वराच्या बंधनात जाणे

५. २४. ५. दुःख-आनंदावर आधारलेले डांगी वाक्प्रचार:

१. खराब दिवस आनात- वाईट दिवस आले

- दुःखाचे दिवस येणे

२. खुशीनी गांडी हुई गय- खुशीने वेडी झाली

- आनंदाने वेडे होणे. आनंद आणि वेड असा विरोधाभास या वाक्प्रचारात आहे.

३. जमीन नादवी दीदी- जमीन नादवून देणे

- उत्साहाने वातावरण भरून जाणे/बेभान होऊन नाचणे

५. २४. ६. व्यसन-आहारावर आधारलेले डांगी वाक्प्रचार:

१. पी पी एकदाज मातीजं उठनाहास- पिऊन पिऊन तब्येत झाली आहे

- दारू पिऊन पिऊन शरीरावर सूज येणे. यालाच ‘टोमसा येणे’ असेही डांगीमध्ये म्हणतात

२. टेम्बरूननां पाना वहडह- टेंबरुनीची (एक झाड) पाने ओढणे

- टेंबरुन या झाडाच्या पानांपासून तयार केलेल्या विड्या ओढणे

३. चाय-पाणी करा- चहा-पाणी केले

- अल्पोपहार करणे, फराळ करणे

४. एक शिशी पी ग्यात- एक शिशी पिऊन गेले

- एक बाटली दारूची पिऊन जाणे

५. बोठला पेटती दे- बोटाला पेटणारी दे

- पहिल्या धारेची दारू बोटाला लावून ती अग्नीजवळ नेली असता पेटते. याच अर्थाने हा वाक्प्रचार आला आहे.

६. भूक-तान पोळी गय- भूक-ताण पळून गेली

- माणूस दुःखी, कष्टी असल्याने त्याला भूक न लागणे

७. पोटमातली भूकनी आग वहलव- पोटातल्या भुकेची आग विझव

- खायला मागणे, भूक शमविणे

५. २४. ७. पक्षी-प्राण्यावर आधारलेले डांगी वाक्प्रचार:

१. मांजर मरी ग्या- मांजर मरून गेले

- मांजराने दूध पिले

२. कोंबडा आरवले-कोंबडा आरवत्याला

- पहाटे

३. कावळा बावळा हुई ग्या- कावळा बावळा होऊन गेला

- भीतीने मन घाबरून जाणे, अस्वस्थ होणे

४. कोनी कुतरा देखायज नीही- कोणी कुत्रा दिसत नाही

- निर्जनस्थळ

५. २४. ८. घर-शेतीशी निगडीत डांगी वाक्प्रचार:

१. कमरना काटा नीट हुयना- कमरेचा काटा नीट होणे

- कष्ट करून खूप थकून जाणे

२. घरदार चालहं- घरदार चालते

- संसार चालणे

३. काम करी मरहस- काम करून मरतो

- खूप कष्ट करणे

४. लाळेलीट अन् काळेकीट हुई मरजोहन- लाळयालीट आणि काळयाकीट होऊन मरतो

- खूप कष्ट करणे

५. खेती वाडीला धावंदुला लागह- शेतात पळायला लागते

- शेतीच्या कामाला जायला लागणे

६. कामला धावंदुला लागह- कामाला पळायला लागते

- काम धंद्याला जावे लागणे

५. २४. ९. इतर प्रकारचे डांगी वाक्प्रचार:

१. पैसा काय झाडला लागताहा- पैसे झाडाला लागणे

- घरात पैसे नसणे

२. थुकी खं- थुंकून खा

- दुसऱ्याची अक्कल घेणे (अक्कल नसलेल्या व्यक्तीला उपहासाने संबोधणे)

३. अखा पैसा चावी खायना- सगळे पैसे चावून खाल्ले

- सगळे पैसे मोडले/संपवले

४. डोकीला हात लावी बिसना- डोक्याला हात लाऊन बसला

- मानसिक तणाव असणे

५. दिवस पाणी करी टाका- दिवस पाणी करून टाकणे

- दशक्रिया विधी आटपणे

६. पुनवनी चांद जीसी- पौर्णिमेच्या चंद्रासारखी

- सुंदर स्त्रीचे वर्णन या वाक्प्रचारातून केले आहे

७. सन खादा- सण खाल्ला

- सण साजरा करणे

८. पोट पडना- पोट पडला

- गर्भ पडणे

९. साहुली पण पाडशील नोको- पावली पण पाडशील नको

- जवळही येऊ नको या अर्थाने

५. २५. वाक्प्रचाराचे वर्गीकरण करताना:

खरे पाहता बहुतेक वाक्प्रचारांचे वर्गीकरण करता येत नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे एकच वाक्प्रचार अनेक वेळा अनेक अर्थ सुचवत असतात. त्यामुळे कोणत्याही वाक्प्रचाराला एखाद्या विशिष्ट हेतूने वर्गीकरण करता येत नाही. ही गोष्ट आपल्याला याआधी दिलेल्या पाण्याच्या उदाहरणावरून लक्षात येईल. तरीही याठिकाणी मी अभ्यासाच्या दृष्टीने ढोबळपणे त्यांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. हे वर्गीकरण तंतोतंत वर्गीकरणाच्या साच्यात बसेलच असे मी कदापि म्हणणार नाही. मुळात हे वर्गीकरण करणेच चुकीचे आहे असे माझे मत बनले आहे.

५. २६. समारोप:

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे आणि वाक्प्रचार यांचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास करत असतांना माझ्या काही गोष्टी लक्षात आल्या त्या अशा की, म्हणींवर मराठी तसेच इतरही अनेक भाषांचा मोठा प्रभाव आहे असे दिसून येते. ज्या डांगी बोलीत म्हणी सापडतात त्याच म्हणी इतरही बोली भाषेत सापडतात. त्याप्रमाणात वाक्प्रचार सापडत नाहीत. अर्थात वाक्प्रचारांवर इतर भाषांचा प्रभाव नाही असे मात्र म्हणता येत नाही. मुळात म्हणी, उखाणे-आहाणे किंवा वाक्प्रचार यांची परंपरा खूप मोठी आहे. त्यांचा इतिहास खूप मोठा आहे. या इतिहासात अनेक घटना घडल्या आहेत. त्यात संस्कृतीचा कधी नाश झाला तर कधी उत्कर्ष झाल्याचे दिसते. या नेहमी बदलत असलेल्या संस्कृतीने येथील डांगी संस्कृतीलाही अनेक वेळा बदलले, घडवले. याचा परिणाम साहजिकच येथील डांगी बोलीतील म्हणी, उखाणे-आहाणे आणि वाक्प्रचार यांच्यावर होणे अपरिहार्य होते.

*****

संदर्भ ग्रंथ:

१. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. ३०७
२. तत्रैव, पृ. ३०९
३. तत्रैव, पृ. ३००
४. शिन्दे विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा-भाग पहिला, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस-पुणे, प्रथमावृत्ती: २६ जानेवारी १९९८, पृ. २१०
५. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. ३००
६. सहल कन्हैयालाल, राजस्थानी कहावतें एक अध्ययन, (पुस्तकाची पाने गहाळ झाल्याने प्रकाशन व आवृत्ती देता आली नाही.), पृ. २०
७. नरवणे विश्वनाथ दिनकर –संपा., भारतीय कहावत संग्रह (Proverbs of India), त्रिवेणी संगम- भाषा विभाग-पुणे, प्रथमावृत्ती: जानेवारी १९७८, पृ. भूमिका- तीन आणि चार
८. कपूर बदरीनाथ- संपा., लोकभारती हिन्दी मुहावरे और लोकोक्ति कोश, लोकभारती प्रकाशन- इलाहाबाद, तृतीय संस्करण: २००५, पृ. २१६.
९. आपटे वा. गो., मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, वरदा प्रकाशन-पुणे, पुनर्मुद्रण: डिसेंबर २०१६, पृ. २५३.
१०. जंगम मेघा बाळासाहेब, निफाड तालुक्यातील लोकसंस्कृती, पृ. १२६
११. महाजन वंदना -प्र. संपा., आदिवासींसमोरील सामाजिक आणि सांस्कृतिक पेच (विशेषांक), आमची श्रीवाणी, जून-सप्टेंबर २०१९, पृ. २३
१२. झांबरे स. ध., साकेत मराठी म्हणी आणि वाक्प्रचार कोश, साकेत प्रकाशन-औरंगाबाद, नवी आवृत्ती: २०१६, पृ. ४२
१३. झांबरे स. ध. -संपा, साकेत मराठी-मराठी शब्दकोश, साकेत प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती: २०१०, पृ. २१४-२१५
१४. अग्निहोत्री द. ह.-संपा, अभिनव मराठी-मराठी शब्दकोश भाग चौथा, व्हीनस प्रकाशन-पुणे, पृ. ४७
१५. राजवाडे वि. का., भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास, लोकवाङ्मय गृह-मुंबई, बारावी आवृत्ती: ऑगस्ट २०११, पृ. प्रस्तावना-सोळा
१६. तायडे पुरुषोत्तम सदानंद-अभ्या., वऱ्हाडी आणि अहिराणी बोलींमधील म्हणींचा तौलनिक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, जून २०१९, पृ. ६५
१७. गारे गोविंद -संपा., आदिवासी लोककथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २०१०, पृ. १८८
१८. देवगांवकर एस. जी., देवगांवकर सौ. शैलजा, पाच आदिवासी जमाती, श्री साईनाथ प्रकाशन-नागपूर, प्रथमावृत्ती: १५ जाने. २०१८, पृ. १२५,१२६

१९. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. २७८, २७९
२०. शिंदे पंडित, कृषीसंस्कृतीमधील लोकवाङ्मय, चिन्मय प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती: नोव्हेंबर २०११, पृ. २२७
२१. पवार पुंडलिक, डांगी लोकसाहित्यविमर्श, गुरु डिझाईन शोप-आणंद-गुजरात, प्रथमावृत्ती: २०१३
२२. देशपांडे कमलाबाई, अपौरुषेय वाङ्मय, मनोहर ग्रंथमाला-प्रकाशन ५२ वे, आवृत्ती: १९४८, पृ. ४६, ४७
२३. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. २९७.
२४. पवार पुंडलिक, डांगी लोकसाहित्यविमर्श, गुरु डिझाईन शोप-आनंद (गुजरात), प्रथमावृत्ती: २०१३, पृ. ४०-४१

साधन व्यक्ती:

१. मिराबेन कनुभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
२. ईशाकभाई कनुभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
३. केथुबेन बाळूभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
४. सलमनभाई शांतारामभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
५. सोनिबेन सुक्करभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
६. रोशनभाई संपतभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
७. कुसुमबेन शांतारामभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
८. याकुबभाई शांतारामभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
९. आंबिबेन रामुभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
१०. आदित्यभाई रामदासभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
११. विलास निलेश देशमुख, मु. शिवारीमाळ पो. चिखली ता. वघई जि. डांग
१२. गंगाभाई भावडूभाई पवार, मु. शिवारीमाळ पो. चिखली ता. वघई जि. डांग
१३. जिज्ञेशभाई मनस्याभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग
१४. आनंदभाई रामजीभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग
१५. कल्याणीबेन मनस्याभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग
१६. लखनभाई मुकेशभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग
१७. सरिताबेन सुरेशभाई पवार, मु. लहानचर्या पो. गलकुंड ता. आहवा जि. डांग
१८. रविनाबेन राजूभाई पवार, मु. लहानचर्या पो. गलकुंड ता. आहवा जि. डांग
१९. प्रविणभाई यशवंतभाई सहारे, मु. पो. गलकुंड ता. आहवा जि. डांग
२०. विदिशाबेन मंछीरामभाई भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग
२१. गोविंद पांडू भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग
२२. रखमी गोविंद भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग
२३. पूजाबेन अनिलभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग
२४. बुधनभाई लासुभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग
२५. जयाबेन बुधनभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग
२६. सरिताबेन पुन्याभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग
२७. पुन्याभाई लासुभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग